-233
म. ग्रं. सं. ठाणें 233
विषय
लेखक छत्रे कृत ग्रंथमाळ
सन १८८८
१/०२१
आ. मो. छत्रे
ग्रंथालय क्रमांक
पुस्तकाचें नांव श्रीमद्गणेशलीलामृत
-२


# श्रीमद्गणेशलीलामृत

प्राकृत आर्या.

233
Copy

म. पु. सं.
१२३
आं. १२३
संग्रहालय
८-७-८७
सन १८९



आत्माराम मोरेश्वर छत्रे.

श्री.

छत्रेकृतग्रंथमाला—अंक २.

# श्रीमद्गणेशलीलामृत.

हा ग्रंथ

आत्माराम मोरेश्वर छत्रे,

असिस्तंत मास्तर, हायस्कूल, बडोदें

यांनीं केला.

तो

श्रीमंत रा. रा. संपतराव गायकवाड

यांनीं उदारबुद्धीनें

मुंबई येथें

"निर्णयसागर" छापखान्यांत छापविला.

आवृत्ति पहिली.

संवत् १९४६—शके १८११.

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ आक्टाप्रमाणें रजिष्टर केलें आहे.

# प्रस्तावना.

श्रीमन्मंगलमूर्तिकृपेनें पूर्वीं कविहृदयांत स्फुरलेल्या, व श्रीमंत रा. रा. संपतराव गायकवाड यांच्या उदारबुद्धीनें हल्लीं जगांत प्रसिद्ध होत असलेल्या स्वकृतग्रंथमालेचा हा गणेशपुराणनामक दुसरा अंक होय. सर्व देवांमध्यें श्रीगणपति हा श्रेष्ठ असून प्राकृतांत त्याचें वर्णन इतर देवांच्या वर्णनापेक्षां फारच थोडें आढळतें. ही उणीव कांहीं अंशीं तरी दूर व्हावी ह्मणून जणू काय त्याच्याच इच्छेनें हें त्याचें वर्णन स्फुरलें.

यास मूलाधार, गणपतिसंबंधी कांहीं संस्कृतपुराणादिग्रंथ, व मुख्यत्वेंकरून गणेशपुराणपर प्राकृत ओंवीबद्ध ग्रंथ, हे होत. मूळांतील विस्तार न घेतां त्यांतील इत्यर्थ केवळ सूत्ररूपानें आर्याछंदीं ग्रथित करून हा नवीन ग्रंथ तयार केला आहे.

याचीं उपासनाखंड व क्रीडाखंड अशीं दोन खंडें आहेत. उपासनाखंडांत श्रीगणपतीच्या भक्तीचा महिमा व-

र्णिला आहे. व क्रीडाखंडांत श्रीगणपतीच्या लीला वर्णिल्या आहेत.

सारांश, ग्रंथकर्त्याचे शारीरिक व मानसिक श्रम आणि छापविणाऱ्याचें औदार्य व धैर्य यांच्या योगानें हा इतका कार्यभाग तर होऊन चुकला. आतां पुढील कर्तव्याचा भाग रसिकजनांकडून कसा काय उचलिला जातो हें अतःपर पाहणें आहे.

शेवटीं, ग्रंथ स्फुरविणाऱ्या श्रीमंगलमूर्तींचे चरण चित्तांत दृढ धरून, स्वाश्रयदाते श्रीमंत रा. रा. संपतराव गायकवाड यांस दीर्घायुष्य व अशीच चिरकाल सद्बुद्धि श्रीपरमेश्वरकृपेनें प्राप्त होण्यास्तव प्रेमपूर्वक इष्टचिंतन करून, रसिकजनांच्या प्रसन्नतेची वाट पहात राहून कालक्रमण करणार.

मु० श्रीवालुकेश्वर,
कार्तिक शुद्ध १
शके १८११.

आत्माराम मोरेश्वर छत्रे,
गणेशलीलामृतकार.

ग्रं. क्र. १०३

## अथ श्रीमत्संपत्पंचक.

श्रीवरद वरि विनवि वाक्
शिव सेवि भजे रमेश रवि वंदी ।
संतत संपत्पंचक-
रस गौरवि शिखिजसंज्ञ आनंदी ॥ १ ॥
परमार्थपरायण पर-
दुःखें दुःखित असे विरल ह्मणती ।
तरि वीरक्षेत्र पहा
केवळ कैलास शिव वटाधिपती ॥ २ ॥
राहोत सपरिवार
प्रेमें श्रीरामलक्ष्मणाख्य यथा ।
वर नर दोघे श्रीवट-
पतिसंपत्संज्ञ भूमिमाजि तथा ॥ ३ ॥
चिरकाल सन्मति सचिव
नांदे सत्संग सैनिक विराजे ।

रंजन रसिकांचें शिखि-
बाळ करी भाट कीर्ति धन साजे ॥ ४ ॥
जी वस्तुविवेक सदा
बुद्धि निवे करुनि याचि ती वंदी ।
वरिवरि संपत्संचक-
रस गौरवि शिखिजसंज्ञ आनंदी ॥ ५ ॥

श्री.

आर्या.

श्रीमद्गणेशलीला-

मृत मथुन पुराणसिंधु कवि काढी ।

शिखिज यदर्थ रसिक तो

श्रीसंपतराव भाविका वाढी ॥ १ ॥

श्रीगजानन.



ग्रा.मा. काव्य

श्रीगणेशाय नमः ॥

## अथ श्रीमन्मयूरात्मच्छत्रेरित-

# गणेशलीलामृत.

### उपासनाखंड

### आर्या.

श्रीमंगलमूर्तिकथा
गौरवि पहिला उपासनाध्याय ।
बर्हिस्वच्छत्रेरित
कवि हरिहरवरदशक्तिरवि गाय ॥ १ ॥

श्रवणेच्छा पुरवाया
सूत वदे शौनकादिकां परिसा ।
अतिमधुर गणेशकथा
यद्योगें सद्य नासती अरि सा ॥ १ ॥

यत्पदपंकज भावें
पूजीती हरिहरादिही सुर ते ।

त्याचें चरित्र पावन
गुह्य न कोणाहि वर्णिलें पुरतें ॥ २ ॥
जे पुण्यवंत केवळ
सुतदारादिकिं विरक्त अधिकारी ।
असती तेचि पुराण-
श्रवणीं जे धन्य धन्य संसारीं ॥ ३ ॥
ब्रह्मा व्यासा सांगे
व्यास भृगूला कथी सविस्तर ते ।
भृगु वर्णि सोमकांता
जन गातां परिसतां चि जे तरते ॥ ४ ॥
तेचि कथा मधुरसुधा
संक्षेपें सांगतों तुह्मा तूर्ण ।
परिसुन पावे गणपति
आटे भवसिंधु हेतु हो पूर्ण ॥ ५ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
पहिला रसभरित गोड अध्याय ॥ १ ॥

श्रीस्त्रीसुतादिकिं कथी
वैराग्य दुजा उपासनाध्याय ।
स्वशिखिच्छत्रेरित कवि
शिवगुरुयोगेश्वरीवरद गाय ॥ २ ॥

सूत वदे ऋषिंलागुन
नृप धार्मिक नीतिमंत भूमिवरी ।
सौराष्ट्रजनपदाभिध
देवनगरिं चक्रवर्ति राज्य करी ॥ १ ॥

तो रूपवंत विद्या-
धीश लसा क्षेमकर पहा साच ।
हो ज्ञानगम्य आणी
सुबल नृपामात्य हे असति पांच ॥ २ ॥

त्याचि चतुरंगसेना
तेवीं गुणशालिनी सती आर्या ।
होति सुधर्मानामें
तरुणी साची पतिव्रता भार्या ॥ ३ ॥

तीचे उदरीं झाला
ऋषि हो शुभलक्षणी तनय साचा ।

तो हेमकंठनामा
प्रिय केवळ कीर्तिपात्र रायाचा ॥ ४ ॥
दैवगतिनें अकस्मात्
ग्रासी तें गलितकुष्ठ निजदेहा ।
तों नृप अमात्यवृंदा
पाचारुन वचन दुःखित वदे हा ॥ ५ ॥
धिग् राज्ययौवनादिक
मज न रुचे आजि अंगनारत्न ।
पाळा सुत राज्य तपो-
वनिं करितों निजशिवार्थ मी यत्न ॥ ६ ॥
इति वदुन मूर्छित पडे
नृप दारसुतादि करिति बहु शोक ।
उठविति नानोपायीं
मंत्री सामात्य नागरिकलोक ॥ ७ ॥
राया प्रधान वदती
येउं तुजसवें अकुत्सवनवासा ।
नृपपत्नीहि सुधर्मा
मानी वनवास उत्सव नवासा ॥ ८ ॥

सुत हेमकंठ राज्य

बहु विनवि पिताहि परिसुनी डोले ।

सूत वदे ऋषिंलागुन

राजा धर्मोक्ति निजसुता बोले ॥ ९ ॥

श्रीरामें पित्राज्ञा

पाळिलि तेवीं तुवां मदाज्ञा ते ।

पाळावि सुखें धन्यचि

ह्मणतिल तुज आणि मज सदा ज्ञाते ॥१०॥

मग उठुन धरुन हातीं

नेउन भद्रासनाजवळ तनया ।

धर्मज्ञ हेमकंठा

उपदेशी सोमकांत धर्मनया ॥ ११ ॥

पाचारुनी पुरोहित

शृंगारुन नगर भूप तें सर्व ।

राज्याभिषेक विधियुत

करी सुता मानि जन महापर्व ॥ १२ ॥

राजा निघे वनीं हें

परिसुनि त्यामागुनी प्रजा जाती ।

शिरुन महावनिं नृप घे
वापी पाहोन तेथ विश्रांती ॥ १३ ॥
समजावुनी प्रजांतें
परत वदे आत्मजा तुवां जावें ।
सत्पुत्र वदे ताता
जेथ तुंवा तेथ म्या विराजावें ॥ १४ ॥
भूप वदे त्यज आग्रह
भज मार्ग यथोपदिष्ट जा मागें ।
आरोग्य देहिं होतां
भेटेन पुन्हा दुजें न मी मागें ॥ १५ ॥
घेउनियां रायाची
आज्ञा दुःखें रडे पुसे मातें ।
गहिंवरुन ती वदे त्या
नगरा जा राहणें वनीं मातें ॥ १६ ॥
वडिलां वंदुन घेउन
त्यांची आज्ञा पुराप्रती तूर्ण ।
घेऊन हेमकंठ
प्रजागण अमात्य जाय संपूर्ण ॥ १७ ॥

श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
दुसरा रसभरित गोड अध्याय ॥ २ ॥

---

श्रीगुरुकृपा नृपावर
गौरवि तिसरा उपासनाध्याय ।
आत्मारामयूर-
च्छत्रेरित रसिक ते शमुनि गाय ॥ ३ ॥

सूत वदे ऋषिंलागीं
प्रजांसवें हेमकंठ पुरिं जाय ।
घेऊन सुधर्मा ही
मग सुबल ज्ञानगम्य वनिं राय ॥ १ ॥
विश्रांति सरोवर तैं
पावति पाहोन रम्य चवघें तीं ।
साधुमनःस्वच्छसलिल
तत्तोयाची यथेच्छ चव घेती ॥ २ ॥

सारून नित्यकर्मा
कंदफळास्तव अमात्य ते जाती ।
घे निद्रा नृपतिचरण-
संवाहन आचरी सुधर्मा ती ॥ ३ ॥

भृगुनंदन विप्रोत्तम
मग तेथें पातला उदककाम ।
संतोषुनी सुधर्मा
चित्तिं ह्मणे प्राप्त साच आराम ॥ ४ ॥

त्यासीं वदे सुधर्मा
तव माता कोण कोण हो तात ।
तव नाम काय वद मम
पंचप्राण प्रसन्न होतात ॥ ५ ॥

ऋषिसुत वदे पुलोमा
माता मम भृगु पिता च्यवन मातें ।
ह्मणति तुह्मि कोण कोठिल
कां वरसी सांग गलितकुष्ठ्यातें ॥ ६ ॥

दुःखें वदे सुधर्मा
मम पति नृप सोमकांत महिवरती ।

विख्यात दैवयोगें
हो कुष्ठि यदर्थ संत गहिवरती ॥ ७ ॥
उदकें भरोन झारी
म्लानमुखें मंदिरीं शिरे पाहे ।
च्यवन भृगु पुसे सांगे
वृत्तांत पित्या समग्र लवलाहें ॥ ८ ॥
ऐकुन निजसुतवचन
द्रवला भृगु मनिं वदे मग उदार ।
वा आण आश्रमातें
सामात्य सवेग भूपति सदार ॥ ९ ॥
इति परिसुनी सुधर्मा-
वलोकनोत्सुक वदे मुनिकुमार ।
जाउन नृपा अभयवच
ह्मणे चला आश्रमास साचार ॥ १० ॥
ऐकुन तद्वचनामृत
पतिसह सामात्य तेथुनि निघे ती ।
भृग्वाश्रमा विसावा
खगमृग निर्वैर जेथ मुनि घेती ॥ ११ ॥

पावन करा वदे त्या
सामात्य सदार भूप हा नमुनी ।
पाहुन आश्वासुन त्या
माभैषीरिति वदे तयास मुनि ॥ १२ ॥

विनयें घालि पुलोमा
शीघ्र सुधर्मेस मंगलस्नान ।
तीं संतोषति षड्रस
भोजन तें करुन अमृतजलपान ॥ १३ ॥

मुनि पूर्वकर्म सांगे
बैसवुन समोर शीघ्र चवघांस ।
देती तदुक्ति राया
अमृताचे जेविं काय चव घांस ॥ १४ ॥

कोल्हारनगरिं विंध्या-
चलाजवळ भाग्यशालि वैश्य वसे ।
चिद्रूपसंज्ञ सुभगा
सुलोचना बायको तयाच्चि असे ॥ १५ ॥

तूं पूर्वि तिचे उदरीं
जन्मसि कामंद नाम तव जाण ।

केला कुटुंबिनीशीं
विवाहसंस्कार तो मनीं आण ॥ १६ ॥

सुत सात पांच कन्या
तीतें होती कुटुंबिनीनाम ।
केलें सत्य तियेनें
पूरित झाले तुझे सकलकाम ॥ १७ ॥

मग तात मृत्युसदना
जाय करी माय शीघ्र सहगमन ।
तूं रूपयौवनमदें
वडिलांचें उडविलें समस्त धन ॥ १८ ॥

नानाछंदिं कुटुंब-
त्याग घडे तुज निघोन पितृगेहा ।
जाय तव सती दिधला
त्रास तुवां बहु जनास वेगें हा ॥ १९ ॥

मग काढविलें नगरा-
बाहेर जनांहिं सांगुनी राया ।
वनिं शिरुन राहसि लुटिसि
पांथस्थां आलि तेथ तव जाया ॥ २० ॥

तूं वधसि एकदा द्विज
गुणवर्धन सांडुनी तदुपदेश ।
ऐसे लक्षावधि ते
वधिले द्विज न करितां कृपालेश ॥ २१ ॥

गेलें तारुण्य जरा
पावे पुत्रादि करिति अवमान ।
तव मानस प्रवर्ते
विचारिं विप्रास देसि तंव मान ॥ २२ ॥

परि दानादि द्विज ते
घेति न तुजपासुनी मनीं आण ।
गणराजमंदिराचा
त्वां जीर्णोद्धार करविला जाण ॥ २३ ॥

व्यय देवालय बांधुन
सकलधनाचा करीसि वांपा हा ।
देहांतिं सुकृत दुष्कृत
तव गणि तो चित्रगुप्त त्वा पाहा ॥ २४ ॥

यम तूस पुसे आधीं
भोगीसी पुण्यपुंज किं अघाली ।

तूं वरिसि पुण्य आधीं
जन्मा तुज ह्मणुन राजकुलिं घाली ॥ २५ ॥
राजोपचार अर्पिसि
गणपतिस ह्मणोन पावसी राज्य ।
परि शिष्टदुरित दुर्धर
ह्मणुनि असे कष्ट पावसी प्राज्य ॥ २६ ॥
हे जन्मांतरवार्ता
परिसे नृप साधुसंगफल लाहे ।
पापालि पक्षिरूपें
देहाबाहेर पडलि लवलाहें ॥ २७ ॥
पक्षी पीडिति ह्मणुनी
प्रार्थि भृगुस भूप हा विगतगर्व ।
मग तो ऋषि करुणाधन
हुंकारें जाळि पक्षिगण सर्व ॥ २८ ॥
वक्ता विनवी श्रोत्या
भृगु कथुन पुराण पाप रायाचें ।
खंडिल मुक्त करिल त्या
कवि आत्माराम गाय गुण साचे ॥ २९ ॥

श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
तिसरा रसभरित गोड अध्याय ॥ ३ ॥

श्रीब्रह्मव्याससमा-
गम कथि चवथा उपासनाध्याय ।
आत्ममयूरच्छत्रे-
रितवरदवरें समग्र कवि गाय ॥ ४ ॥

**राजा वदे कृपा करिं**
**सांगे चिंतून चित्तिं मुनिराय ।**
**ऐक गणेशपुराण-**
**श्रवणात्मक उद्धरास्तव उपाय ॥ १ ॥**
**प्रोक्षि मुनि जपुन मंत्रुन**
**गणेशनामाष्टशत शरीरिं जल ।**
**नृपनासिकरंध्रांतुन**
**पुरुष निघे कृष्णवर्ण हो नवल ॥ २ ॥**

वाढे स्थूल भयंकर
वाटे पावे जनास संताप ।
तूं कोण मुनि पुसे त्या
तो बोले मी असें पुरुष पाप ॥ ३ ॥

सकलप्राणिशरीरीं
मीच वसें मुनिवरा दुराचारी ।
त्वन्मंत्रितजलयोगें
पडलों बाहेर मी क्षुधित भारी ॥ ४ ॥

शुष्कतरु मदाज्ञेनें
खा न तरी भस्म करिन तुज तूर्ण ।
हें ऋषि वदे तरु पुरुष
भक्षि जळे आम्रवृक्ष संपूर्ण ॥ ५ ॥

ऋषिशापभयें भस्मीं
प्रविशे तो पापपुरुष लवलाहें ।
संतोषुनी नृप वदे
रक्ष मुने मजवरी करिं कृपा हे ॥ ६ ॥

शुभदगणेशपुराण
श्रवण करीं मुनि वदे नृपा तूर्ण ।

गणपतिवरें अघ सरे
आम्रतरु पुन्हा फुटेल संपूर्ण ॥ ७ ॥
भूप पुसे तुज कोठुन
लाधे व्यासा कथी चतुर्वदन ।
व्यास मज कथि मुनि वदे
कथितों तुज परिस हो यशःसदन ॥ ८ ॥
भृगुतीर्थीं स्नान करुन
करितां श्रवणार्थ पुण्यसंकल्प ।
सकलनृपार्ति सरे मुनि
पुराणमहिमा वदे न जो स्वल्प ॥ ९ ॥
मुद्गल ऋषि जें सांगे
ऋतुविध्वंसार्तियुक्तदक्षनृपा ।
तें सादर परिसावें
आत्मारामावरी गणेशकृपा ॥ १० ॥
कलियुगिं जगदुद्धारा-
स्तव वदला व्यासमुनि बहु पुराणें ।
पावे विघ्न स्तविला
न गजानन मंगलार्थ हो जाणें ॥ ११ ॥

जाऊन सत्यलोका
व्यास पुसे विधिस वंदि तच्चरण ।
ब्रह्मा वदे करावें
आधिं गणेशार्थ मंगलाचरण ॥ १२ ॥
व्यास वदे पद्मभवा
आलों तुज शरण मी मला तार ।
गणपतिचि ते स्वरूप-
स्थिति त्याचे कितिक सांग अवतार ॥ १३ ॥
त्या पूर्वि कोण अर्ची
तेणें कवणा प्रसाद हा केला ।
त्याची अघटित लीला
वद कशि मी परिसण्या बहु भुकेला ॥ १४ ॥
कथिलें विधान आगमिं
विधि बोले सप्तकोटि मंत्रांचें ।
श्रेष्ठ मज कथि षडक्षर
एकाक्षर त्यांतुनीहि शिव साचें ॥ १५ ॥
मंत्रोपासक जीवन्-
मुक्त तयांचाचि सार संसार ।

ऐकें उपासना हे
व्यासा एकाक्षराचि साचार ॥ १६ ॥
संध्यादिकविधिपूर्वक
आचरुन गणेशमूर्तिसंस्मरण ।
करणें साक्षात्कारा-
पर्यंत यथोक्त तें पुरश्चरण ॥ १७ ॥
एकाक्षरमंत्र असें
सांगून विधान कर्णि आयकवी ।
व्यासभ्रांति मिटे कथि
तत्पृष्टगणेशगुह्य आदिकवी ॥ १८ ॥
ॐकाररूप निर्गुण
लंबोदर निर्मि सगुण साकार ।
मायेनें विधिहरिहर
ते भ्रमती करिति तत्स्तवन फार ॥ १९ ॥
प्रकटुन अधिकार सगुण
सृष्टिस्थितिलयिं गणेश त्यां अर्पी ।
श्वासें ओढुन दावुन
निजमाया हृदयिं विधिस बहु तर्पी ॥ २० ॥

पाहुन कुक्षि अनंत
ब्रह्मांडें विधि निघे विगतगर्व ।
बाहेर होय अंत-
हिंत गजमुख यत्कृपा घडवि सर्व ॥ २१ ॥

श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
चवथा रसभरित गोड अध्याय ॥ ४ ॥

---

श्रीहरिकृतमधुकैटभ-
वध कथि पंचम उपासनाध्याय ।
केकिस्वच्छत्रेरित
कवि लोकहितार्थ तो स्मरे गाय ॥ ९ ॥

चतुरास्य गणेशवरें
होतां गर्विष्ठ विघ्नपुरुष तया ।
भिववििति तत्स्तुत गणपति
माभैषीरिति वदे करूनि दया ॥ १ ॥

गर्जून नभोवाणी
पुन्हा वदे तप करीं परी न कळे ।
मंत्रविधान ह्मणे विधि
निद्रित हो स्वप्निं बाळ पाहि पळें ॥ २ ॥
त्याजवळ जाय विधि शिशु
शुंडाग्रें प्रोक्षि तच्छिरीं तोय ।
कथि निजमंत्रविधि उठे
गणपति जपतां प्रसन्न त्या होय ॥ ३ ॥
नानोपचारिं पूजुन
विधि दे त्या सिद्धिबुद्धि निजकन्या ।
धन्या वदे असो मम
भक्ति सदा तव पदांबुजिं अनन्या ॥ ४ ॥
अंतर्हित हो गजमुख
मग विधि करि सृष्टि निद्रित रमेश ।
असतां तत्कर्णाहुन
असुर निघति देति बहुतसे क्लेश ॥ ५ ॥
विधि विनवि योगनिद्रे
ह्मणे उठवि हरिस करिव लोक सुखी ।

मधुकैटभवध हो तों
हरि लावुन फुंकि पांचजन्य मुखीं ॥ ६ ॥
करि मल्लयुद्ध त्यासीं
परि ते नाटोपती असुर दोघे ।
जाय वनांतरिं मांडी
गायन गंधर्ववेष हरि तो घे ॥ ७ ॥
परिसुन शिव संतोषे
पाचारि वदे हरीस कैलासीं ।
आरंभि गणेशार्चन
न करिसि तूं क्षीणशक्ति जालासी ॥ ८ ॥
भक्तिबळें विष्णु पुसे
मंत्र षडक्षर तयास शिव सांगे ।
हरि सिद्धक्षेत्रिं जपे
पावोन ह्मणे गणेश वर मागें ॥ ९ ॥
मधुकैटभमृति मजहुन
घडो हरि वदे तथास्तु तोहि ह्मणे ।
गणपतिदेवालय तैं
स्थापी हरि गांठि दैत्य शूरपणें ॥ १० ॥

ते दैत्य धर्मयुद्धें
नाटोपति हरि वदे तयां मागा ।
वर ते ह्मणति अह्मासीं
मागावा त्वांचि रे महाभागा ॥ ११ ॥

माझ्या हातें पावा
निधन हरि वदे तथास्तु ते ह्मणतां ।
वधि त्यां सुदर्शनें हरि
गणेश भावें प्रसन्न हो प्रणतां ॥ १२ ॥

श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
पंचम रसभरित गोड अध्याय ॥ ५ ॥

---

श्रीमुद्गलदक्षसमा-
गम षष्ठ कथी उपासनाध्याय ।
बर्हिस्त्रातपवारण-
नोदित सिकतेश भावि कवि गाय ॥ ६ ॥

गणपतिवरप्रतापें
वधितां मधुकैटभाख्यदानव ते ।
स्तविति हरिस सुर तो कथि
गणेशमाहात्म्य विधिस मानवतें ॥ १ ॥
विधि कथि कौंडिन्यपुरीं
व्यासा वैदर्भदेशिंचा आर्या ।
भीमाख्यभूप होता
त्याचि सती चारुहासिनी भार्या ॥ २ ॥
तन्मंत्रि सुमंतु मनो-
रंजन होते परंतु संतान ।
पोटिं नसे ह्मणुन निघे
वना रुचे राज्य भाग्यवंता न ॥ ३ ॥
राज्यभर अमात्यांवर
विश्वासुन चारुहासिनी जाय ।
घेउन संगें वनिं हो
तृषित सरोवर विलोकि शुभ राय ॥ ४ ॥
प्राशुन सभार्य तज्जल
विश्वामित्राश्रमा नृपति पाहे ।

मुनिस नमि तो ह्मणे तुज
सुत होइल वर्तमान कथिं गा हें ॥ ५ ॥
मुनि बोले ऐकुनि त-
द्वृत्त उपेक्षसि गणेश भगवंत ।
कुलदेवता ह्मणुन तुज
पुत्र न हो परिस पूर्वजोदंत ॥ ६ ॥
तुजपासोनी होता
तव पूर्वज कीर्तिमंत अष्टम हा ।
तद्भार्या कमला हो
तदुदरिं सुत रोगि भोगि कष्ट महा ॥ ७ ॥
तन्नाम दक्ष ठेवी
बारा वर्षें तयाप्रती पाळी ।
परि रोग शमे न वनीं
स्त्री ससुता धाडण्यान्वि ये पाळी ॥ ८ ॥
वनिं फिरतां ग्राम पुढें
तिस लागे गाणपत्य विप्राचा ।
पथिं अंगवायु हो तो
आतळतां दिव्य देह पुत्राचा ॥ ९ ॥

त्या जन पुसति विनोदें
काय तुझें नांव कोण हो तात ।
ऐकून पुसे माते
सुत कथि मज सकल कष्ट होतात ॥ १० ॥
त्या ति वदे कर्णाटक-
देशीं भानुनगरीं नृपति पाहें ।
वल्लभनामा त्याची
मी महिषी तो तुझा पिता आहे ॥ ११ ॥
इत्यादि परिसुनी तो
हर्षें अष्टाक्षराख्यमंत्रजप ।
करि हो प्रसन्न गणपति
दक्ष ह्मणे सफल पूर्व सुकृततप ॥ १२ ॥
बोले गणेश मुद्गल-
नामा मद्भक्त करिल तव पूर्ण ।
सकलमनोरथ होसी
यदंगवातें पवित्र तूं तूर्ण ॥ १३ ॥
इति वदुन गजानन हो
अंतर्हित दक्षचित्तिं शोक महा ।

पावे फिरे जनीं वनिं
तों पाहे दिव्य मुद्गलाश्रम हा ॥ १४ ॥
तेथ गजमुखाराधन-
तत्पर मुद्गल मुनींद्र अवलोकी ।
निजवृत्तकथनपूर्वक
वंदि वदे सकलसिद्धि पवलों कीं ॥ १५ ॥
मग दक्षसव्यकर्णीं
एकाक्षरमंत्र सविधि मुनि सांगे ।
दक्षा वदे त्यजिसि हा
न तरि सदा सिद्धि तव गृहीं जागे ॥ १६ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
साहावा हा रसाळ अध्याय ॥ ६ ॥

---

श्रीबल्लाळेशकथा
वर्णीं सप्तम उपासनाध्याय ।

शितिकंठस्वच्छत्रे-
रित कविवर वालुकेश्वरा गाय ॥ ७ ॥

मग सोमकांत भृगुतें
प्रश्न पुसे एक मानि आश्चर्य ।
गणपति दर्शन पावे
दक्ष न मुद्गल किमर्थ मुनिवर्य ॥ १ ॥

भृगु सांगे पल्लीपुरिं
वैश्य वसे सिंधुदेशिं कल्याण ।
नामा वरि इंदुमती
भार्या बल्लाळ तत्तनय जाण ॥ २ ॥

मेळवुनी बाळांचा
मेळा बल्लाळ पूजुनि गणेश ।
ग्रामाबाहेर वसे
ताडि पिता परि न घे तदुपदेश ॥ ३ ॥

एकदिनीं वनिं जाउन
देवालय मोडुनी पिता बांधी
वृक्षिं सुता ताडुन बहु
शापि पित्या सुत गणेश आराधी ॥ ४ ॥

तैं ब्राह्मणस्वरूपें
गणपति बल्लाळ बंधमुक्त करी ।
व्याधिग्रस्त पिता हो
तो तव शापान्वयें वदे सदरी ॥ ५ ॥
याठायिं वाढवावें
बल्लाळ वदे स्वकीयमहिम्यातें ।
देव वदे भक्तांस्तव
धरिलें त्वन्नाम उत्तमहि म्यां तें ॥ ६ ॥
भाद्रपदसितचतुर्थिस
भक्तमनोरथ करीन मी पूर्ण ।
बल्लाळविनायक या
नामें हें वदुन गुप्त हो तूर्ण ॥ ७ ॥
झालें मंदिर तैं हो
बल्लाळेश्वरनिवास अद्यापी ।
पल्लीनगरीं कोंकण-
देशिं विनायक पुनीत.करि पापी ॥ ८ ॥
बल्लाळभक्त बाळक
अर्ची सद्भक्तिनें विनायक तो ।

जन धांवे पाहाया
कौतुक सत्कीर्ति कोण नायकतो ॥ ९ ॥
बल्लाळशापयोगें
अंध बधिर मूक रोगि हो तात ।
माता विनवि सुत ह्मणे
न वितथ भक्तवरशाप होतात ॥ १० ॥
माता पिता सुहृज्जन
बंधु असे एक मम गजानन हा ।
रक्षीं मन त्याचे पदिं
त्याचें-सेवन करीत नित्य रहा ॥ ११ ॥
वल्लभसंज्ञमहानृप-
भार्या होशिल भवांतरीं कमला ।
दक्षाभिध रोगि उदरिं
तव सुत जन्मेल साच विदित मला ॥१२॥
इति परिसुन दुःखिं गृहा
यमसदना जाति दंपती जाण ।
कमला हो इंदुमती
भृगु सांगे दक्ष तोचि कल्याण ॥ १३ ॥

भीम पुसे तप कोठें
विश्वामित्रा करीतसे दक्ष ।
कौंडिन्यवनिं मुनि ह्मणे
तप करि दिन एकविस धरुन लक्ष ॥ १४ ॥
स्वप्निं गजानन येउन
अभिषेकी आपणा असें पाहे ।
माते कथी वदे ती
राज्य सुता पावशील बापा हें ॥ १५ ॥
कौंडिन्यपुरींचा नृप
दैवें मृति चंद्रसेन तो पावे ।
सुलभा तद्वनिता करि
शोक वदे मजवरी न कोपावें ॥ १६ ॥
खेदें अमात्य मिळुनी
ह्मणती चालेल राज्यभार कसा ।
तेथें मुद्गलनामा
पावे मुनिराज लोकतारकसा ॥ १७ ॥
खिन्न अमात्य विलोकुन
गजशुंडीं द्यावि मुनि वदे माळा ।

घालिल यत्कंठीं तो
राजा आज्ञा तयाचि ते पाळा ॥ १८ ॥
कौंडिन्यवनिं अमात्य-
प्रार्थित गज जाय जैं बसे दक्ष ।
ध्यानस्थ घालि माळा
तत्कंठिं गणेशभजनिं जो दक्ष ॥ १९ ॥
हर्षें अमात्य मिरवुन
भद्रासनिं सविधि बैसविति तूर्ण ।
पावे स्वस्थाना मुनि
दक्षमनोरथ करून परिपूर्ण ॥ २० ॥
परिसुन वल्लभराजा
दक्षपिता तेथ ये सुता भेटे ।
हर्षें नमि कमला निज-
भर्ता आलिंगितां सुता नेटें ॥ २१ ॥
आज्ञापि वीरसेना
स्वामि गजानन ह्मणून तो धन्या ।
कन्यादानविधानें
दक्षा गौरवुन अर्पि निजकन्या ॥ २२ ॥

तज्ज बृहद्भानुपुढें
खड्गधर तयापुढें सुलाभ पहा ।
पद्माकर रिपुमर्दी
मग तव हो चित्रसेन जनक महा ॥ २३ ॥

विश्वामित्र ह्मणे तव
पूर्वजमहिमा परीसतां तूर्ण ।
अधमाधमास मंगल-
धामिं घडे लाभ भीमका पूर्ण ॥ २४ ॥

श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
सप्तम रसभरित गोड अध्याय ॥ ७ ॥

---

श्रीरुक्मांगदकष्ट
प्रकटवि अष्टम उपासनाध्याय ।
नीलगलनिजच्छत्रे-
रित कविवर वेंकटेश्वरा गाय ॥ ८ ॥

मग विश्वामित्र नृपा
एकाक्षरमंत्र सदय उपदेशी ।
सुत पावशिल वदे त्या
नमुनि निघे नृप सभार्य निजदेशीं ॥ १ ॥
निर्मूनि गणेशालय
तप करितां एकनिष्ठ सुतकाम ।
पावे गणेश सुत हो
रुक्मांगद भूप ठेवि तन्नाम ॥ २ ॥
एकाक्षरें निजात्मज
उपदेशी स्थापि राज्यि लवलाहें ।
मृगये जाय तृषित हो
आश्रमिं वाचक्नवीमुनिस पाहे ॥ ३ ॥
तद्भार्या रूपवती
पाहुन दोघां तयां नमी राय ।
क्षण घे विश्रांति नृपा
स्नानार्थ असें ह्मणोन मुनि जाय ॥ ४ ।
दे शीतलोदक मला
भूप वदे लागली तृषा माते ।

ठेवुनि पुढें जल वदे
ती रतिसुख·दे त्वरें नृपा मातें ॥ ५ ॥
भूप वदे मी गणपति-
भक्त न पीडा मला मदन दे हा ।
धरितां बळें पळे ती
शापि वदे वरिल कुष्ठ तव देहा ॥ ६ ॥
तत्काळ शापयोगें
नृप हो कुष्ठी स्मरे गजानन हा ।
नारद ये तेथ वदे
परिसुन तद्वृत्त शोक तो न वहा ॥ ७ ॥
चिंतामणिगणनायक
विदर्भनगरीं कदंबतीर्थि वसे ।
जें एक शूद्र कुष्ठी
न्हाउन हो दिव्यदेह गाहतसे ॥ ८ ॥
नृप नारदाप्रति पुसे
तेथें पूर्वी गजानन स्थापी ।
कोण करूनी तेथें
स्नान कथीं कोण उद्धरे पापी ॥ ९ ॥

नारद वदे परिस मीं
केलें स्वर्गास एकदिन गमन ।
आश्चर्य देखिलें जगिं
काय पुसे इंद्र मज करी नमन ॥ १० ॥
मी त्या वदें विलोकिलि
जाउन गौतमवना सती भार्या ।
गौतममुनिचि रतिसमा
बोले भोगीन इंद्र मी आर्या ॥ ११ ॥
टाकोनि सकळ उद्यम
अमराधिप गौतमाश्रमा जाय ।
धरुनि कपटवेष रमे
तिशिं जैं स्नानार्थ जाय मुनिराय ॥ १२ ॥
परि दिव्यवास येतां
जाणे दुष्टा ह्मणे सती कपट ।
तूं करिसि कोण अससी
शापभयें इंद्र गुप्त हो प्रकट ॥ १३ ॥
ऋषि ये गृहा पुसे तिस
ती कथि त्या वृत्त तो तिला शापी ।

होशिल शिला रघूत्तम
उद्धरिल मृषा मदुक्त न कदापी ॥ १४ ॥
मुनिशापबळें गौतम-
वनिता नारद ह्मणे शिला होते ।
परिसून गुप्तरूपें
इंद्र ह्मणे पाप मज घडे हो तें ॥ १५ ॥
मार्जारवेष धरि त्या
मुनि बोले हो सहस्रभगवंत ।
परभगलंपट पावे
तो कष्ट यदर्थ कष्टती संत ॥ १६ ॥
इंद्र कमळनालिं शिरे
प्रार्थीति मदुक्त देव गौतम हा ।
बोले जपुन षडक्षर
मंत्र कृपा करिल तो गणेश पहा ॥ १७ ॥
नेत्र सहस्रभगांचे
होतिल हो शुद्धगात्र परिसावें ।
मग बाहति सुर तो हरि
जेथ असे कष्टि तेथुनी पावे ॥ १८ ॥

उपदेशि तो षडक्षर
मंत्र सुरेंद्राप्रती सुराचार्य ।
हो दिव्यदेह दशशत-
नेत्र हरि समस्त देव कृतकार्य ॥ १९ ॥
तप करि षडक्षर जपे
सहस्र वर्षं महेंद्र तो पावे ।
गणपति इंद्र ह्मणे मी
अपराधी मजवरी न कोपावें ॥ २० ॥
चिंतामणि नाम धरीं
जगदुद्धारार्थ येथ जो न्हाय ।
तो सिद्धि वरो भाविक
हो गुप्त ह्मणे तथास्तु गणराय ॥ २१ ॥
वैनायकी करोनी
मूर्ति तयाठायिं इंद्र तो स्थापी ।
स्वर्गा पावे आत्मा-
राम गजाननकथामृत सदा पी ॥ २२ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।

स्वाभिध पुराणसंमत
अष्टम रसभरित गोड अध्याय ॥ ८ ॥

श्रीमन्नवगृत्समदा-
ख्यान नवम कथि उपासनाध्याय ।
स्वकलापिच्छत्रेरित
कवि सज्जन गौरवी वरद गाय ॥ ९ ॥

व्यास विरंचीस ह्मणे
कदंबतीर्थमहिमा कथुनि जाय ।
स्वर्गी जेव्हां नारद
मुनि रुक्मांगद करीतसे काय ॥ १ ॥

ब्रह्मा वदे कथुनि तें
वृत्त निजजना गृहाहुनी राय
जाय पळें रुक्मांगद
यथाविधि कदंबतीर्थि तो न्हाय ॥ २ ॥

तैं चिंतामणि पूजुन
भावें दे ब्राह्मणा महादान ।

हो दिव्यशरीर तया
पावे गणपतिवरें सुरविमान ॥ ३ ॥
राजा गणां वदे मम
गणपतिदर्शन करोत पितर पळें ।
गण ह्मणति पुण्य दे त्यां
दर्भाचे करुनि न्हाय तो पुतळे ॥ ४ ॥
मंत्र कुशोसीति ह्मणुन
न्हातां उद्धरति ते पितर सर्व ।
पावति गणेशलोका
सकळ विमानस्थ हो महापर्व ॥ ५ ॥
धाता कथी मुकुंदा
नामें वाचक्नवीमुनिचि ललना ।
रुक्मांगदरूपा हो
पाहुन मदविव्हला यशःसदना ॥ ६ ॥
रुक्मांगदवेषें तिस
भोगि न कळतां सुरेश गृत्समद ।
तत्सुतनाम न जाणुन
ठेवि कथि गणेशमंत्र त्या शुभद ॥ ७ ॥

मागधनामा मागध
भूप सुधर्मा वरी सती भार्या ।
सुमति अमात्यद्वय नृप
अत्र्यादि निमंत्रि विप्र कृतकार्या ॥ ८ ॥
त्यांत मुकुंदात्मज ये
गृत्समद वदे तयास अत्रि तदा ।
विप्र न रुक्मांगदसुत
तूं श्राद्धा योग्य नससि गृत्समदा ॥ ९ ॥
क्रोधें गृत्समद पुसे
वृत्त मुकुंदा कथी मनीं आण ।
सुतशापें ती बदरी
तच्छापें दैत्य तत्तनय जाण ॥ १० ॥
गर्जोन नभोवाणी
कथि इंद्राहून होय गृत्समद ।
तो जाय अनुष्ठाना
कवि आत्माराम गाय कविवरद ॥ ११ ॥
व्यास वदे पद्मभवा
गृत्समदाख्यान हें श्रवण तूर्ण ।

**करितां भावें पावे**
**गणपति करि सकल हेतु परिपूर्ण ॥ १२ ॥**

श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
नववा रसभरित गोड अध्याय ॥ ९ ॥

---

श्रीयुक्तगृत्समदवर-
लाभ दशम कथि उपासनाध्याय ।
बर्हिस्वप्रतपत्रे-
रित कवि भवसिंधु हा तरे गाय ॥ १० ॥

**गृत्समद भ्रमण करित**
**पुष्पकसंज्ञवनिं जाय लवलाहें ।**
**नमुनि मुनिंस तद्वचनें**
**पादांगुष्ठीं तपे उभा राहे ॥ १ ॥**
**पंचदशसहस्रसमा**
**करितां तप एकदंत तो पावे ।**

सिंहारूढ भयें त्या
गृत्समद ह्मणे मसीं न कोपावें ॥ २ ॥
ध्यात्या गणेश चित्तीं
माभैषीरिति वदे वरा याचीं ।
गृत्समद ह्मणे मी हो
धन्य कृपा मसि गणेशपायांची ॥ ३ ॥
दे ब्राह्मणत्व पुष्पक
गणेशपुर निर्मि पुष्पकवन महा ।
गणपति तथास्तु होइल
रुद्रावांचुन ह्मणे सुत अजित हा ॥ ४ ॥
वैदिकमंत्र गणानां-
त्वेति जपसि तूं ह्मणून ऋषि याचा ।
आठव आधिं फलद तव
मग सर्वारंभकार्यिं मन साचा ॥ ५ ॥
कृतिं पुष्पक हें त्रेता
युगिं मणिपुर भानकाख्यपुर मान ।
द्वापरिं भद्र कलियुगीं
होइल करि पूत तेथ जो स्नान ॥ ६ ॥

हे वरदोक्ति वदुन हो
गुप्त गजानन तयाचि ते स्थापी ।
गृत्समद मूर्ति ठेवी
तन्नाम वरद पवित्र हो पापी ॥ ७ ॥

बोले व्यासा विधि हें
आख्यान श्रवण पठन जे करिती ।
काम सकल पावुनियां
ते निःसंशय गणेशपद वरिती ॥ ८ ॥

श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
दाहावा हा रसाळ अध्याय ॥ १० ॥

श्रीवरदकृतपुरकृपा
कथि एकादश उपासनाध्याय ।
शितिगलनिजातपत्रे-
रित भगवज्जन उदार कवि गाय ॥ ११ ॥

व्यासा ह्मणे विधाता
पाचारुन विप्रपंक्ति गृत्समद ।
यज्ञसमारंभ करी
पावे सुत हो प्रसन्न तो वरद ॥ १ ॥
शिशु तेजस्वी पाहुन
गृत्समद भयें तया पुसे माता ।
कोण पिता तव मी सुत
बाळ वदे पाळ मज न भीं ताता ॥ २ ॥
हर्षभय पावुनी सुत
मानुन उपदेशि मंत्र गृत्समद ।
त्या तो जपे वनिं तपे
कांपति सुर हो प्रसन्न त्या वरद ॥ ३ ॥
त्रैलोक्याकर्षणिं मज
शक्ति असो नाम मत्तपःस्थान ।
पावो गणेशपुर हें
बाळ वदे वरद डोलती मान ॥ ४ ॥
गणपति ह्मणे त्रिजगिं तूं
विजयी होशिल शिवाविणें जाण ।

हैमायसरौप्यपुरा
वरिशिल भेदील एक शिवबाण ॥ ५ ॥
काश्मीरशिलामूर्ति
स्थापि करुन गजमुखालया असुर ।
त्रिपुराव्हय बंगाला-
भिधदेशिं वसे रची गणेशपुर ॥ ६ ॥
जिंकुन पृथ्वी पावे
स्वर्गा इंद्रा वदे रणार्थ निघें ।
अथवा ये शरण असें
परिसुन हो इंद्र सिद्ध सुरतति घे ॥ ७ ॥
सेना त्रिधा विभागी
त्रिपुर वदे कालकूट दैत्य तसा ।
जो वज्रदंष्ट्र त्या घ्या
लोकद्वय इंद्र जिंकितों सहसा ॥ ८ ॥
मग तें बहुप्रकारें
देवासुरयुद्ध वर्ततां घोर ।
इंद्रादिदेव जिंकुन
असुरीं आनंद मांडिला थोर ॥ ९ ॥

इंद्रासन आक्रमुनी
दुंदुभि वाजवुनि फिरविती द्वाही ।
कीं त्रिपुर इंद्र आजी
हो स्वर्गा वरति दैत्य लवलाहीं ॥ १० ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
अकरावा हा रसाळ अध्याय ॥ ११ ॥

---

श्रीवरदकृतसुरकृपा
बारावा कथि उपासनाध्याय ।
बर्हिस्वच्छत्रेरित
कवि वरदकृपाकटाक्षगुण गाय ॥ १२ ॥
इंद्र पराभवुन असुर
धांवे शिव जिंकण्यास कैलासीं ।
मंदारा सगण निघे
घेउन शिव सान्निदार कैलासीं ॥ १ ॥

वैकुंठाहून निघे
विष्णु वसे क्षीरसागरिं सभार्य ।
विधि जाय सत्यलोका-
हुन राहे नाभिपद्मिं तो आर्य ॥ २ ॥
चंडप्रचंड होते
तन्मानसपुत्र देवनरतापी ।
वैकुंठलोकिं चंड
प्रचंड तो ब्रह्मलोकिं संस्थापी ॥ ३ ॥
त्रैलोक्यविजय गोद्विज-
सतीछळ ऋतुहति स्वधास्वाहा- ।
लोप स्वधर्मखंडन
मांडि असुर देवगण वरि गुहा हा ॥ ४ ॥
हृतविभवस्वालय सुर
चिंतातुरमानस त्वरा जमुनी ।
करितां वरिष्ठ नारद
उपदेशि गणेशमंत्रराज मुनी ॥ ५ ॥
करुनि गणेशाराधन
पावे द्याया गजानन वर दया

सुरसंघ त्रिपुरासुर-
भय हो न वदे तथास्त्विति वरद या ॥ ६ ॥
द्विजवेषें त्रिपुरासुर-
गृहिं जाय निजाभिधा कलाधर तो ।
सांगे त्रिधातुकपुरें
रचि सायक भार एकला धरतो ॥ ७ ॥
वस या पुरा द्विज ह्मणे
भेदिल शिव मात्र शशिकला धरता ।
नाम असुर त्रिवाचा
सत्य वदे सत्य तव कलाधरता ॥ ८ ॥
दे त्या वरा द्विज ह्मणे
असुरा जिंकुन गणेशमूर्ति शिवा ।
दे असुर तथास्तु ह्मणे
शिवा रणा दे गणेशमूर्तिशिं वा ॥ ९ ॥
युद्धाविणें न दे शिव
मूर्ति ह्मणुन सबळ दैत्य ये समरा ।
शिवहि ससेन भिडे रणिं
पावे बहु झगडतां विजय अमरां ॥ १० ॥

त्रिपुरासुरबळ हाहा-
कार करी कालकूटमुख तूर्ण ।
स्कंदप्रमुख शिवाचें
करि जयजयकार सैन्य संपूर्ण ॥ ११ ॥

श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
बारावा हा रसाळ अध्याय ॥ १२ ॥

---

श्रीशिवकृतत्रिपुरवध
कथि तेरावा उपासनाध्याय ।
स्वशिखिच्छत्रेरित कवि
वरदवरबळें त्रितापहर गाय ॥ १३ ॥

मग वारुणास्त्र दितिसुत
सोडी वातास्त्र शिव वरी दैन्य ।
योजि नगास्त्र असुर शर
सोडी प्रलयाग्नि जाळि सुरसैन्य ॥ १ ॥

ज्वालांतुन पुरुष उठे
भक्षी बहु देवसैन्य होरपळे ।
शिव एकला गिरिदरी-
माजी देखून पुरुष घोर पळे ॥ २ ॥
त्रिपुरासुर शिवमंदिरिं
शिरे हिमालय उमा लपवि आर्या ।
चिंतामणिमूर्ति असुर
ने ती हो गुप्त विघ्न तत्कार्या ॥ ३ ॥
नारद कथी षडक्षर
एकाक्षरमंत्रजप शिवा धांवे ।
शिव दंडकवनिं तप करि
दशवर्षे त्या गणेश तो पावे ॥ ४ ॥
शिववक्राहून निघे
शशिशेखर मुंडमालि पंचास्य ।
दशकर भस्मयुत शिव-
स्वरूप पाहे गणेश करि हास्य ॥ ५ ॥
पंचवदन पंचशिरीं
नमी स्तवि गणेश हेतु करि पूर्ण ।

कथि निजनामसहस्र
त्रिपुर वध ह्मणोन गुप्त हो तूर्ण ॥ ६ ॥
नाम गुणेश विधि वदे
मी मंगलमूर्ति ठेवि शिव त्याचें ।
शैवादिजना स्मरतां
मंगल जें आधिं कार्यि हो साचें ॥ ७ ॥
परिसुन शिववरवार्ता
सुरसंघ करावया समर पावे ।
कळतां हें लवलाहें
त्रिपुरासुर घेउनी स्वबळ धांवे ॥ ८ ॥
देवासुर अन्योन्या
हाणिति बहु निकर मांडि असुरेश ।
सुर पळति भयें शिव तो
चिंतातुर आठवी मनिं गणेश ॥ ९ ॥
मग नारदमुनि सांगे
शिवा असुर मारशील एकशरें ।
तरि गणपतिप्रसादें
सत्वर तें पावशील तूं यश रे ॥ १० ॥

योजिं धरारथ रविशशि-
चक्रद्वय मेरुधनु दयाल हरी ।
शर आश्विनेय हय विधि
सारथि शिव रथि उठे दयालहरी ॥ ११ ॥
मंत्री सहस्रनामें
आधीं मग जपुन सोडि शिव बाण ।
त्राण त्रिजगिं न लाहे
त्रिपुर जळे असुर हो गतप्राण ॥ १२ ॥
हर्षें दुंदुभि वाजे
भेटति सुर गाति शंभुमहिमा ज्ञे ।
त्रिपुरज्योति विराजे
शिवदेहिं गणेशनाममहि माजे ॥ १३ ॥
त्रिभुवनकंटक घोर
त्रिपुरासुर धर्मवर्णनाशक तो ।
शिववैरें हो शिव जन
कोण प्रभुकर्मवर्णना शकतो ॥ १४ ॥
आनंद हो प्रवर्ते
स्वधर्म लोकीं घडे स्वधास्वाहा ।

कारक्रतुस्थिति भजे
आत्मारामा गजानन स्वा हा ॥ १५ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
तेरावा हा रसाळ अध्याय ॥ १३ ॥

---

श्रीवरदचतुर्थीव्रत
कथि चवदावा उपासनाध्याय ।
आत्मारामममयूर-
च्छत्रेरित चवरि वारि कवि गाय ॥ १४ ॥

व्यास ह्मणे पद्मभवा
वधिला कवण्या दिनीं असुर कोठें ।
अंबा वसे व्रतें शिव
कवण्या पावे कथीं नवल मोठें ॥ १ ॥
विधि बोले त्रिपुरहर
त्रिभुवनकंटकविनाशि बापा हा ।

कार्तिकमासीं सायं-
काळिं असुर दुःखराशि बा पाहा ॥ २ ॥
त्रिपुरीचा त्रिपुरोत्सव
करितां वैभव समस्तजन पावे ।
यासाठीं शिव भोळा
अर्चावा पौर्णिमेस त्या भावें ॥ ३ ॥
पावे त्रिकाळ करितां
शिवपूजन वक्रतुंड हरि ताप ।
गौरीमन संतोषे
दूर पळे सप्तजन्मकृत पाप ॥ ४ ॥
करि ज़ो प्रदोषकाळीं
देवालयिं रुचिर दीपशोभा ते ।
त्या जगदात्मा तारी
त्यावरि कामारि ठेवि लोभातें ॥ ५ ॥
त्रिपुरक्षयविजयध्वनि
गव्हरिं परिसुन निघे भवानी ती ।
संतोषून गुहेंतुन
बाहेर वनांत एकली भीती ॥ ६ ॥

व्याघ्रादि तेथ पाहुन
हा तात ह्मणोन मारि हाकेला ।
हा प्राणनाथ बोले
त्वां केविं वियोग सहन हा केला ॥ ७ ॥
पूर्वी करितां प्राण-
त्याग तुवां करविला किं शिवयोग ।
करविं पुन्हा मज ताता
शिवसंग सुखार्थ हो यदुपयोग ॥ ८ ॥
तवतनया रडते वनिं
हें परिसुन हिमनगा कथि निषाद ।
समजावि हिमाग सुते
न वरिं वदे प्राकृतापरि विषाद ॥ ९ ॥
तूं सर्वशक्ति केवळ
तथापि माहेरिं चल रहावें गे ।
परिसुन सुखें विराजे
पितृमंदिरिं सुंदरी पहा वेगें ॥ १० ॥
न गमे जिणें पतिविणें
उमा ह्मणे तों पिता कथि उपाय ।

न विनायकीचतुर्थी-
व्रताविण गणेश दावि निजपाय ॥ ११ ॥
व्रतविधि सविस्तर पिता
कथि परिसुन ती वदे विनायक तो ।
कोणा पावे पूर्वी
कोण विनायकगुण कवि नायकतो ॥ १२ ॥
परिस नग ह्मणे कथितों
तुज कथि शिव जें षडानना कन्ये ।
आख्यान कर्दमाचें
पावन भूलोकिं तें परम धन्ये ॥ १३ ॥
कर्दमनामा राजा
क्रीडे हरितुल्य जिंकुन धरा हे ।
भृगुस पुसे भाग्य मला
कोणा पुण्यें मिळे मुनिवरा हे ॥ १४ ॥
ऋषि बोले तूं क्षत्रिय
दुर्बलनामा दरिद्र मति आण ।
होतासि पूर्वि जासी
कुटुंब सोडुन महावना जाण ॥ १५ ॥

दारिद्र्यदुःख परिसुन
मुनि सौभरि कळवळोन कथि तुजसीं ।
शीघ्र अगाध गणेश-
व्रतमहिमा तूं तया पुन्हा पुससी ॥ १६ ॥
कोण गणेश कसें व्रत
कथिं मज मुनि परिसुनी असें डोले ।
व्यापक अगम्य नित्य-
ज्ञानमय गणेश तो असें बोले ॥ १७ ॥
श्रावणशुक्लचतुर्थी-
हुनं भाद्रपदाख्यमासपर्यंत ।
आचरणें व्रत सविधि
व्रतमहिमा वर्णि हा सपर्यंत ॥ १८ ॥
परिसुन ऐसा व्रतविधि
करितां व्रत हो प्रसन्न गणराय ।
जाय दरिद्रपण कृपा
करितां गणपति असे उणें काय ॥ १९ ॥
शिव षण्मुखा वदे हो
क्षत्रियदारिद्र्यशमन बापा हें ।

भृगु कर्दमा वदे गण-
नाथवरें भाग्य तूस बा पाहें ॥ २० ॥
शंभुप्रिये हिमालय
बोले ऐसेंच आचरी तूर्ण ।
व्रत नलराय गजानन
त्याचें करि सकल हेतु परिपूर्ण ॥ २१ ॥
तुज कन्यके कथीतों
आतां चंद्रांगदाभिधाख्यान ।
देऊन चित्त ऐक
श्रवणें संतोषतील तव कान ॥ २२ ॥
मालवनामकदेशीं
अत्युत्तम कर्णनाम पुर होतें ।
चंद्रांगदसंज्ञनृप
स्त्री इंदुमती पतिव्रता हो ते ॥ २३ ॥
इंदुमती तरुणवया
असतां मृगये वना निघे राय ।
हाय ह्मणे ती जावें
मंदिरिं टाकोन सुंदरी काय ॥ २४ ॥

करुन समाधान तिचें
वनिं विविध श्वापदें वधी धीर ।
तों तेथ महाराक्षस
पावति भक्षिति अनेक ते वीर ॥ २५ ॥
तैं एक राक्षसी हो
भुललि नृपा पाहुनी नृपति टाकी ।
चंद्रांगद चुकवोनी
लवलाहें तीस ती उडि तटाकीं ॥ २६ ॥
राक्षस अमात्य भक्षिति
कांसारीं तो पडे तळा जाय ।
राय धरिति त्याचे त्या
वंदोनी नागकन्यका पाय ॥ २७ ॥
तत्पृष्ट कथी स्वकथा
उदकाबाहेर नृप ह्मणे काढा ।
हांसुन त्या ह्मणति न हो
आढळला रोगि का ढकलि काढा ॥ २८ ॥
ऐकोन एकपत्नी-
व्रत भूप वदे असे पहा मम ते ।

इंदुमती भार्या तिज-
वांचुन दुजि मजसिं मातृवत् गमते ॥ २९॥
हें ऐकुन त्या खिन्ना
होती इकडे कळे अशुभवार्ता ।
इंदुमतीतें ति वदे
हानाथेत्यादि सत्वर भवार्ता ॥ ३० ॥
वृद्ध पुरोहित तीतें
ह्मणती कार्यार्थ करुं नको शोक ।
स्थापिति राज्यीं तत्सुत
येती ते जाति निजगृहा लोक ॥ ३१ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
चवदावा हा रसाळ अध्याय ॥ १४ ॥

श्रीशिवशिवासमागम
पंचदश कथी उपासनाध्याय ।

आत्ममयूरच्छत्रे-
रित पुरुषप्रकृतियोग कवि गाय ॥ १९ ॥
कन्ये ह्मणे हिमालय
इंदुमती शोकविव्हला होते ।
द्वादश वर्षें दुःखें
जातां तत्कर्म खंडलें हो तें ॥ १ ॥
सौभाग्यचिन्हहीना
नारद तिस पाहुनी ह्मणे कां गे ।
राक्षसभयें तडागीं
बुडे पति ह्मणोनि त्यास ती सांगे ॥ २ ॥
तव पति आहे जित करिं
श्रृंगार असें तदुक्त परिसुनि तें ।
इंदुमती नमन करी
घालुनि सौभाग्यभूषणें मुनितें ॥ ३ ॥
दे आशीर्वाद तिला
सौभाग्यवती भवेति मुनि तूर्ण ।
भेटेल केविं कोठें
पति हें पुसतां निवेदि संपूर्ण ॥ ४ ॥

श्रावणशुक्लचतुर्थी-
पासुन मृण्मयगणेश आराधीं ।
भाद्रपदसितचतुर्थी-
वरि तें व्रत करुन कार्य निज साधीं ॥ ५ ॥
पावेल गणेश असें
सांगुन मुनि जाय सविधि धन्या ते ।
व्रत करितां तिस पावे
गणपति दे सुमति नागकन्यांतें ॥ ६ ॥
वस्त्रादि नागकन्या
देउनि चंद्रांगदास बोळविती ।
पति येतां इंदुमती
आनंदें नमुनि मान डोलविती ॥ ७ ॥
जाति गजस्कंधावरि
चंद्रांगदभूप आणि इंदुमती ।
मिरवत मंदिरिं शिरती
करुनी व्रत पूर्ण गजमुखा नमती ॥ ८ ॥
पर्वत बोले कन्ये
इंदुमती जा व्रतें वरद पावे ।

पावावें त्यांहि शिवा
वेगें त्याची व्रतेंकरुन भावें ॥ ९ ॥
तातमुखें परिसुन हें
व्रत करितां पार्वतीस भक्तिबळें ।
पावे गणपति भेटे
शिव पुरुषप्रकृति एक होति पळें ॥ १० ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
पंचदश रसाळ गोड अध्याय ॥ १९ ॥

---

श्रीमद्भ्रुशुंडिवार्ता
कथि सोळावा उपासनाध्याय ।
केकिस्वच्छत्रेरित
नुरगि भवार्ता कदापि कवि गाय ॥ १६ ॥
नृप शूरसेननामा
होता विख्यात मध्यदेशींचा ।

कातातिपुण्यशीला
महिमा शेषा न वर्णवे जीचा ॥ १ ॥
भूप सभेंत अकस्मात्
बसतां गंधर्वनृत्यगान वदे ।
परिसुन दूतांस करा
शोध कसा शब्द तोष हा नव दे ॥ २ ॥
नृपकिंकर लक्षावधि
बाहेर पडुन विमान पाहति तें ।
कुष्ठी एक विलोकी
तों खालिं पडे वरी अधोगतितें ॥ ३ ॥
हें परिसुन राय निघे
पाहे होउन तुरंगमारूढ ।
नमुनि पुसे इंद्रा त्या
इंद्र वदे परिस वृत्त हें गूढ ॥ ४ ॥
घेउन नारदवचनें
भ्रुशुंडिदर्शन नभीं परत जातां ।
पाहे विमान कुष्ठी
तव दास तदा वरी अधःपाता ॥ ५ ॥

राजा ह्मणे सुरेंद्रा
आधीं वार्ता भ्रुशुंडिची सांग ।
देवेंद्र कथी राजा
भ्रुशुंडिवृत्तांत परिस हा सांग ॥ ६ ॥
नंदनपुरिं कैवर्तक-
नामा हो दुष्ट जार जो चोर ।
घालविती तो नगरा-
बाहेर त्रास पावतां थोर ॥ ७ ॥
मग सकुटुंब वसे वनिं
लुटि पांथस्थांस एकदिन जाय ।
लुटण्या व्यर्थ श्रमि हो
पथिं ह्मणुनि गणेशतीर्थि तो न्हाय ॥ ८ ॥
मार्गीं मुद्गलदर्शन
हो तद्धननार्थ शस्त्र करि नग्न ।
परि सद्दर्शनयोगें
कुधि निवळे हो तदंघ्रिरजिं लग्न ॥ ९ ॥
मुनि त्या वदे विनायक-
नाम जप फुटेल शुष्कयष्टिस हा ।

पल्लव येईन पुन्हा
उद्धरण्या तोंवरी असा च रहा ॥ १० ॥
बैसे तेथचि तस्कर
वाढे वारुळ तनूवरी पाहे ।
मुनि काढुन तों भ्रुकुटी-
पाशिं फुटे सोंड दिव्यतनु लाहे ॥ ११ ॥
पावोन पुनर्जन्मा
पावे नाम भ्रुशुंडि हें तूर्ण ।
एकाक्षरें वसिष्ठा-
दिक उपदेशिति मुनींद्र संपूर्ण ॥ १२ ॥
तप करितां हस्त वरद
त्याचे मस्तकिं गणेश तो अर्पी ।
मद्रूप होसि मत्पद
वरिशिल कल्पांतिं हें ह्मणुन तर्पी ॥ १३ ॥
होईल क्षेत्र महा-
सिद्धिद हें नामलेंति विख्यात ।
मन्मूर्तिदर्शनें जन
न वरि पुनर्जन्म मृत्युलोकांत ॥ १४ ॥

इत्यादिनारदोक्तें
तद्दर्शन घेउनी परत जातां ।
खालिं विमान पडे हो
भूप चकित आयकोन वृत्तांता ॥ १५ ॥
मग देवेंद्रास पुसे
विमानगत्यर्थ तो नृप उपाय ।
संकष्टिचतुर्थीव्रत-
पुण्यार्पण कथि सुमार्ग सुरराय ॥ १६ ॥
भूप ह्मणे व्रत केवीं
साधावें तें सुराधिपा सांग ।
मजलागीं लवलाहें
आचरिलें पूर्वि कोणिं तें सांग ॥ १७ ॥
देवेंद्र ह्मणे होता
राजा कृतवीर्य धार्मिक सुगंधा ।
वनिता सती सुत न हो
ह्मणुनि तपे सुकवि तोडि भवबंधा ॥ १८ ॥
त्याचे कष्ट विलोकुन
नारद पितृलोकिं जाय मुनिराय ।

कथि तत्पित्या तव तपे
सुत सुतकाम ह्मणुनी करिं उपाय ॥ १९ ॥
त्या वदुन असें नारद
पावे यमलोकिं तेथ अवलोकी ।
नरकीं भ्रुशुंडिचे पितृ-
गण येउन त्या निवेदि भूलोकीं ॥ २० ॥
हें परिसुनी भ्रुशुंडी
प्रार्थि गजानन सदाधि जो हरि तो ।
संकष्टिचतुर्थीव्रत-
पुण्यार्पण करुन पितर उद्धरितो ॥ २१ ॥
दिनमात्रव्रतयोगें
उद्धरती सर्व वर्ष आचरितां ।
पुण्य अगाध न गणवे
कवि आत्माराम गाय सच्चरिता ॥ २२ ॥
मग नारदोक्त परिसुन
कृतवीर्यपिता विधींस विधिलोकीं ।
जाय पुसे सुतसंत-
त्यभावकारण वदे द्रुहिण तो कीं ॥ २३ ॥

तव पुत्र सोमनामा
होता अंत्यज भवांतरीं विप्र ।
द्वादश पथिं वधि दिनिं करि
उपास शश्युदयिं पारण क्षिप्र ॥ २४ ॥
निजपुत्रा माघासित-
चतुर्थिस ह्मणे अगा गणेशा हें ।
असकृत् घडे न कळतां
व्रत पावे ह्मणुन राज्य बा पाहें ॥ २५ ॥
परि त्या ब्रह्मवधोत्थित
घडे अघ न हो ह्मणोनि संतान ।
हें परिसुन भूप भयें
ह्मणे कथिं उपाय उबगिं संता न ॥ २६ ॥
वेधा कृतवीर्यपित्या
बोले ब्रह्मघ्नताघनाशक तें ।
संकष्टिचतुर्थीव्रत
ध्याया संततिसुखा जना शकतें ॥ २७ ॥
व्रतमहिमा राया तुज
कथिला हा हेतु जो करी पूर्ण ।

अंगारकीव्रताचा
महिमा श्रोते करा श्रवण तूर्ण ॥ २८ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
सोळावा हा रसाळ अध्याय ॥ १६ ॥

---

श्रीअंगारकिचें व्रत
कथि सतरावा उपासनाध्याय ।
बर्हिस्वातपवारण-
नोदित कवि भव तरावया गाय ॥ १७ ॥
ब्रह्मा ह्मणे श्रवण करिं
महिमा अंगारकीचतुर्थीचा ।
जीच्या श्रवणें व्यासा
पावे गति उत्तमा मद्दानीचा ॥ १ ॥
जगिं विख्यात अवंती-
नामें नगरी असे मुनिवरा जे ।

भारद्वाज ऋषीश्वर
तींत जितेंद्रिय तपोधन विराजे ॥ २ ॥
मुनि करि नदीतटीं तप
तैं न्हातां एक सुंदरी पाहे ।
मुनिवीर्य शिरे तदुदरिं
जन्मे आरक्त पुत्र लवलाहें ॥ ३ ॥
साता वर्षांचा हो
बाळ पुसे आइ कोठ मम तात ।
जाउन भारद्वाजा
क्षिति बोले हंसुन जोडुनी हात ॥ ४ ॥
तव रेतें ये मदुदरिं
ह्मणुनी वाढवुनि आणिला गेहा ।
जाणुन उपनयन करुन
उपदेशी मुनि गणेशमंत्रें हा ॥ ५ ॥
करुनी प्रसन्न वरदा
बाळ वदे अमृतपानसद्भाव ।
पावो मला तव पदीं
माझें मंगल असें असो नांव ॥ ६ ॥

चंद्रोदयिं माघासित-
चतुर्थिला भेटसी ह्मणुन बा हें ।
व्रत करित्या पावो तव
पद वरद वदे तथास्तु लवलाहें ॥ ७ ॥
मंगलनाम सुधाशन
वरिशिल अंगारकत्व अवलोकीं ।
अंगारकीचतुर्थी-
महिमा वाढेल येथुनी लोकीं ॥ ८ ॥
नृप होशील अवंती-
नगरीं सुख भोगशील संपूर्ण ।
ऐसें बोलुन गणपति
तो अंतर्धान पावला तूर्ण ॥ ९ ॥
कांचनमंदिर करुनी
तैं मंगलमूर्ति भौम हा स्थापी ।
गणपतिवरप्रसादें
भक्षि सुधा स्वर्गिं राहुन सदापि ॥ १० ॥
स्रष्टा बोले व्यासा
गेलों शिवदर्शनार्थ शिव नमुनी ।

स्तविला तों येउन दे
अमृतफळ शिवास नारदाख्य मुनि ॥ ११ ॥
शंभु पुसे मज कोणा
द्यावें फळ मी षडानना द्यावें ।
ह्मणतां नेत्र वटारुन
ये मजवर सत्यलोकिं रागावे ॥ १२ ॥
पाहुन विक्राळवदन-
गजानना चंद्रमा करी हास्य ।
शापि गणेश ह्मणे त्या
कष्टी हो पाहतां जन तवास्य ॥ १३ ॥
परिसुन झांकि निजवदन
शशि देव प्रार्थितां वरद बोले ।
ममवरदचतुर्थीविण
शशिमुख हो शुद्ध हें ह्मणुन डोले ॥ १४ ॥
शक्रमुखें एकाक्षर-
मंत्राचा घे शशांक उपदेश ।
गंगादक्षिणतटिं तप
करि दे वरदान तोषुनि गणेश ॥ १५ ॥

संकष्टिचतुर्थीव्रत-
दिनिं मज अर्चून अर्घ्य तुज देतो ।
जो त्वदुदयिं तद्व्रत हो
पूर्ण सुखें भाळिं मी तुला घेतों ॥ १६ ॥
हे वदुन वरद वाणी
अदृश्य झाला गणेश बापा हा ।
पावे निजाश्रमीं तो
तेथून सुखी शशांक बा पाहा ॥ १७ ॥
कृतवीर्यपिता ब्रह्या
बोले दूर्वांचि कां प्रिया वरदा !
त्या कमलासन बोले
दूर्वामाहात्म्य ऐक विमल सदा ॥ १८ ॥
दक्षिणदेशीं क्षत्रिय
जांबपुरिं वसे सुलभ सती मुद्रा ।
द्विज मधुसूदन येतां
भिक्षार्थ तया हंसे शमसमुद्रा ॥ १९ ॥
द्विज सुलभा शापि वृषभ
होशिल दे शाप ऋषिस मुद्रा हो ।

गर्दभ तूं चांडाळिण
होशिल मुनि तिस वदे न मुद् राहो ॥२०॥
ती हो चांडाळिण तैं
चेतवि हिमवारणार्थ तृणभार ।
दूर्वांकुर एक पडे
वातें तद्गत गणेशिं साचार ॥ २१ ॥
खरवृषभ भांडतां तृण
उधळुन चांडाळिचे गणेशशिरीं ।
दूर्वांकुर पडति तिथें
विमानिं बैसवि कृपा गणेश करी ॥ २२ ॥
घंटानाद परिसुनी
द्विज विस्मित दूत हो ह्मणति सांगा ।
आह्मि गणेशोपासक
असुनि न देखों गणेशपद कां गा ॥ २३ ॥
हें श्रवण करून वचन
ते वदति गणेशदूत हांसतसे ।
ब्राह्मण हो दूर्वार्पण-
महिमा ठावा तुह्मा विशंक नसे ॥ २४ ॥

गणपतिभक्त स्थावर-
नगरीं कौंडिन्यसंज्ञ ऋषि राहे ।
स्त्री आश्रया पुसे तो
दूर्वामाहात्म्य वर्णि लवलाहें ॥ २५ ॥
हर्षें वसतां हो यम
सभेंत कामार्त नाचतां पदर ।
पडतां तिलोत्तमेचा
कुच मर्दि मुखेंदु चुंबि वरि न दर ॥ २६ ॥
वीर्य अधोगति पावे
अनलासुर तेथ हो महाकाय ।
हर्युक्तसुर गणेशा
स्मरती आश्चर्य हो पहा काय ॥ २७ ॥
गजवदन विष्णुरूप
प्रकटे अवलंबि बाळवेष पळें ।
बोले मी अनलासुर-
वधार्थ आलों सुरां ज तत्त्व कळे ॥ २८ ॥
मग देव पळति येतां
अनलासुर शब्द करित विक्राळ ।

जलधिस अगस्त्यसा त्या
गिळि मुख पसरोन बाळक विशाळ ॥२९॥
पावे गणेश देहीं
दाह गिळुन असुर कांडदाहकसा ।
दे इंद्र चंद्र तो धरि
भालेंद्वभिधान लावि दाह कसा ॥ ३० ॥
अर्पि कमल कमलापति
करि ठायीं ठायिं नागबंधन हा ।
गणपति धरि ऋषिदत्ता
दूर्वा मग दाह शांति वरि अघहा ॥ ३१ ॥
गणपति ह्मणे सुखें मम
पूजन दूर्वाविणें न लाभावें ।
एकविस एक वा जन
दूर्वांकुर वाहतां मला भावे ॥ ३२ ॥
मंदिर निर्मुनि उत्तम
बैसविति गणेशमूर्ति सुर सर्व ।
विघ्नहर नाम ठेविति
कवि आत्माराम मानि सुखपर्व ॥ ३३ ॥

कौंडिन्य ह्मणे कथिलें
दूर्वामाहात्म्य तूस संपूर्ण ।
आनंदें परिसुन ती
तत्पद गजगामिनी नमी तूर्ण ॥ ३४ ॥

श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
सतरावा हा रसाळ अध्याय ॥ १७ ॥

---

श्रीयुतदूर्वामहिमा
कथि अठरावा उपासनाध्याय ।
शितिकंठस्वच्छत्रे-
रित कवि महिमाजि वरद्व्यश गाय ॥ १८ ॥

कौंडिन्य वदे सुंदरि
एकदिन गणेशदर्शना जाय ।
नारद कथि वरदा त्या
कौतुक सादर बसोन मुनिराय ॥ १ ॥

मैथिलनगरिं जनकनृप
विख्यात जगीं विलोकुन वदान्य ।
वदलों त्या तुज सुख दे
गणपति जो साधुमानसा मान्य ॥ २ ॥

इत्युक्त वदे ब्रह्म-
ज्ञानी ब्रह्माहमस्मि धरि गर्व ।
सर्वमिदं भगवानिति
वदलों कळतां कळेल सुखपर्व ॥ ३ ॥

स्वर्गिं मुनि जाय गजमुख
संत्व निघे देखण्यास जनकाचें ।
वृद्धब्राह्मण कुत्सित
होउन जो देखण्यास जन काचे ॥ ४ ॥

वृत्तांत नृपद्वारिं
सेवकजन कळवि तो जनकराया ।
इच्छिसि काय पुसे नृप
वरद वदे इच्छि भोजन कराया ॥ ५ ॥

नेऊन पाकशाले
अन्नें बहु पात्रिं वाढलीं तूर्ण ।

न ह्मणे पुरे गट करी
पक्कान्न अपक्कधान्य संपूर्ण ॥ ६ ॥
मग वाढलिं वन्यफळें
अतृप्त बोले न हो उदरपूर्ति ।
उद्धरि एक द्विज गृहिं
तोषे दूर्वांकुरें वरदमूर्ति ॥ ७ ॥
परि निःसंशय तीचे
दूर्वामाहात्म्य नायकति कर्ण ।
जा स्वर्गिं मुनि वदे घे
दूर्वांकुर आण तत्सम सुवर्ण ॥ ८ ॥
इंद्रभुवनिं जाउन पति-
वचन कथि ह्मणे सुरेंद्र तिस द्यावें ।
त्वां कनक कुबेरगृहा-
हुन दूर्वाभार निजगृहा जावें ॥ ९ ॥
तेथोन आश्रया ये
कुबेरगृहिं पारडें न तें हाले ।
नवनिधि घालून तुले
दूर्वांकुर ठेवितां नवल झालें ॥ १० ॥

धनद स्वस्त्रीचे नग
निजधन इंद्रादिदेवगण सकल ।
सर्वस्व विष्णु घाली
परि हाले पारडें न हो नवल ॥ ११ ॥
दूर्वामाहात्म्य मुनिस
शरणागत ह्मणति सुर अह्मा न कळे ।
निःसंशया मुनिसती
पूजी दूर्वांहिं वरद भक्तिबळें ॥ १२ ॥
दूर्वामाहात्म्य ऋषिस
हें वदति गणेशदूत संपूर्ण ।
दूर्वायोगें खरवृष
चांडाळीसहित उद्धरति तूर्ण ॥ १३ ॥
दूर्वांचें स्मरण करुन
हो दारुण पाप दग्ध लवलाहीं ।
तो चिंतामणिसंज्ञ-
क्षेत्राचा वर्णिला सुमहिमा ही ॥ १४ ॥
पूजि गणेशोपासक
वरद न दूर्वांहिं जो नरक वरि तो ।

दूर्वांहिं पूजि जो जन
अघनिधि तो दर्शनेंचि उद्धरितो ॥ १५ ॥
ब्रह्मा कृतवीर्यपित्या
बोले तुझिया सुतास संतान ।
होईल चतुर्थीव्रत
करितां संदेहलेश संता न ॥ १६ ॥
मग शूरसेन इंद्रा
बोले कृतवीर्य तो करी काय ।
शक्र वदे पुस्तक दे
स्वप्निं लिहुन तत्पिता कथि उपाय ॥ १७ ॥
संकष्टीव्रतमहिमा
सांगे संतान होइल क्षिप्र ।
हें परिसुन नृप जागृत
होउन पाचारि अत्रिमुख विप्र ॥ १८ ॥
ग्रंथार्थ विचारोनी
विधियुक्त करीतसे व्रतग्रहण ।
दे वरद वर जयाचे
आत्माराम स्मरे सदा चरण ॥ १९ ॥

व्रत पूर्वि कोणि केलें
प्रकट जगीं काय पुण्यफल सांग ।
ऐसें राजा पुसतां
ब्रह्मा वर्णन करीतसे सांग ॥ २० ॥
स्कंदार्थ शिवोक्ता करि
उमा व्रत अगस्ति सिंधुपानार्थ ।
दमयंती स्वपतिस्तव
सुतार्थिनी रुक्मिणी वरि स्वार्थ ॥ २१ ॥
करि अनिरुद्धार्थ प्र-
द्युम्न करुन कृष्ण उद्धवाज्ञा ते ।
मान्य शिव रणास्तव मी
सृष्ट्यर्थ सुखार्थ सेविती ज्ञाते ॥ २२ ॥
भृगु वर्णि सोमकांता
संकष्टीव्रतमहत्व पद्मज हा ।
व्यासा कथि अंश पुढें
हरिचा जन्मेल कार्तवीर्य पहा ॥ २३ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।

स्वाभिध पुराणसंमत
अठरावा हा रसाळ अध्याय ॥ १८ ॥

---

श्रीसंकष्टी गौरवि
एकुणिसावा उपासनाध्याय ।
नीलगलस्वच्छत्रे-
रित कवि संकष्टहरवरद गाय ॥ १९ ॥

श्रीगणपतिप्रसादें
कांता दोहदवती सुत प्रसवे ।
कृतवीर्याची परि हो
थोटा मोटा न शोक तो कथवे ॥ १ ॥
सचिवादि सांत्विता नृप
संपादी जातकर्म धरि भाव ।
धन दे द्विजां सुताचें
ठेवितसे कार्तवीर्य हें नांव ॥ २ ॥
द्वादशवर्षें होतां
श्रीदत्तात्रेय अत्रिपुत्र मुनी ।

पावे किमर्थ येणें
हो नृपति पुसे सुखें तया नमुनी ॥ ३ ॥
मुनि बोले आलों परि-
सुनि तवसुतकीर्ति कौतुक पहाया ।
भूप समारंभें सुत
आणवि अवलोकितो मुनि महा या ॥ ४ ॥
संकष्टीव्रतजागरिं
न करीसि विजृंभणांतिं आचमन ।
व्यंग मुनि वदे झाला
सुत होइल यलि सांग साच मन ॥ ५ ॥
एकाक्षरें तया उप-
देशि मुनि अदृश्य हो तपा जाय ।
वनिं कार्तवीर्य पावे
वर माग ह्मणे प्रसन्न गणराय ॥ ६ ॥
तव दर्शनें ह्मणे मी
धन्य असें अन्य काय शुभ सांग ।
माग वर ह्मणसि तरि तव
कृपाबळें मम शरीर हो सांग ॥ ७ ॥

गणनाथ तथास्तु ह्मणे
होउन अणुमान तद्धृदयिं शिरतां ।
सांग सहस्त्रार्जुन हो
हर्ष नृपा सुख जना गणेशिं स्त्वां ॥ ८ ॥
प्रावाली सविधि वरद-
मूर्ति स्थापी प्रवालगणप असें ।
तन्नाम हो प्रवाल-
क्षेत्र सुविख्यात लोकपावनसें ॥ ९ ॥
तप करि धरा धराया
तें शेष ज्ञानबल सहस्त्रशिरें ।
श्रैष्ठ्य नवनागकुलिं वरि
धरणीधर नाम हें गणेशवरें ॥ १० ॥
व्यास पुसे यानासह
हरि पडतां शूरसेन करि काय ।
हरिसुत ह्मणे चतुर्थी-
व्रतमहिमा परिसुनी वदे राय ॥ ११ ॥
सेवक हो धांवावें
नगरामाजी तुह्मी त्वरें जावें ।

संकष्टिचतुर्थीव्रत
करिते स्त्रीपुरुष कोणि शोधावे ॥ १२ ॥
दूत सहस्रावधि पुरिं
फिरतां पाहति विमान अद्भुतसें ।
घरदवरें दिव्यतनू
चांडाळी एक त्यांत बैसतसे ॥ १३ ॥
मग राजदूत ह्मणती
गणेशदूतां किमर्थ तरिसा गा ।
चांडाळीं हे गति वरि
त्यां वदति गणेशदूत परिसांगा ॥ १४ ॥
सारंगधर क्षत्रिय
होता बंगालदेशिं गुणधाम ।
हें पूर्वजन्मिं होतें
तत्कन्यारत्न सुंदरीनाम ॥ १५ ॥
योजि तिस चित्रनाम-
क्षत्रिय वर तत्पिता दुराचार ।
परि करि ते वंचुन निज-
पति भोगी स्वैरिणी सदा जार ॥ १६ ॥

तिस एकदा तिचा पति
बहुधा धिक्कारि साधण्या वैर ।
क्रोधें तदुदर शस्त्रें
फोडुन निशि भोगि जार ते स्वैर ॥ १७ ॥
तैं राजदूत धरिती
राजा वधतां यमापुढें नेती ।
यमदूत यातना बहु
भोगुन चांडालगेहिं जन्मे ती ॥ १८ ॥
मदिरापान करुनि घे
दिननिद्रा रात्रि मागण्यास निघे ।
भिक्षा गाणेशगृहा
चंद्रोदयिं वरदनाम मुखिं मनिं घे ॥ १९ ॥
संकष्टिचतुर्थीव्रत
दिवसिं घडे न कळतां उपास तितें ।
तोषुन विमान पाठवि
वरद चरण धन्य जे उपासति ते ॥ २० ॥
पडला सविमान ह्मणति
हरि परिसुन राजदूत संपूर्ण ।

पावेल चतुर्थीव्रत
पुण्या जाईल तो तरी तूर्ण ॥ २१ ॥
ईतें संकष्टीव्रत
घडलें तें पुण्य पाहिजे दिधलें ।
होईल द्विगुण भलें
देतां तें दूत हो इणें वहिलें ॥ २२ ॥
हें उभयदूत वदती
तों चढलि विमानिं दिव्यकांता ते ।
तत्तनुवातस्पृष्ट ख
वरि हरि सविमान पुसुन भूपातें ॥ २३ ॥
सुविमान शूरसेना
व्रतयोगें पाठवी वरद तुष्ट ।
सनगर निघे विमान न
चले पुसे कोण नृप असे दुष्ट ॥ २४ ॥
गौडजनपदीं ह्मणती
दूर्वाभिध गौडजन वसे द्विज हा ।
भार्या शाकिन्याख्या
बुधनामा दुष्ट हो तदुदरिं पहा ॥ २५ ॥

वेश्या भजे स्वभार्या
सावित्री सुंदरी सती सोडी ।
जोडि अयश माय पिता
कांता वधि मद्य पी सुपथ मोडी ॥ २६ ॥
वेश्येस वदे आलों
त्वदर्थ निर्वंध वधुन मी सकलां ।
वेश्या भयें रमे वरि-
वरि दावि प्रीति ठावि तीस कला ॥ २७ ॥
ग्रामांतरिं कुमति शिरे
कालभिनामा नदीतटा विप्र ।
स्नानार्थ जाय तत्स्त्री
भोगि बळें शापि त्यास ती क्षिप्र ॥ २८ ॥
तूं भोगिसी बळें पर-
दारा वरिशील कोड बापा हा ।
यमदंड भोगुन पुन्हा
जन्मे याचें न तोंड ञा पाहा ॥ २९ ॥
राजा दूतांस वदे
पतिताचा त्याग मी करुं कसा गा ।

खंडेल पापराशी
जेणें नेणें उपाय ठिक सांगा ॥ ३० ॥
दृढ धरुन चरण त्यांचे
राजा विनवीतसे दयालहरी ।
उचलोनि उद्धरा हो
- निरुद्ध राहो न वर दयाल हरी ॥ ३१ ॥
दूत वदती विनायक-
नाम श्रुतिरंध्रि सांग नायकवीं ।
अन्य त्रिवार हो शुचि
विमान चाले कृपा विनायक वी ॥ ३२ ॥
संकष्टिचतुर्थीव्रत-
महिमा व्यासा परीस महिमाजी ।
श्रोते न सहस्रार्जुन-
कथानकाचा भुलोत महिमा जी ॥ ३३ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
रसाळ एकोनविंश अध्याय ॥ १९ ॥

श्रीपरशुराम गौरवि
वरद विसावा उपासनाध्याय ।
स्वकलापिच्छत्रेरित-
कवि सकला पिच्छवीजिता गाय ॥ २० ॥

पाराशर विधिस वदे
न गणेशकथासुधाश्रवणपान ।
दे तृप्ति चित्त वाढवि
गाढ विती अधिकवासना कान ॥ १ ॥
भार्गवराम कवण तो
कोणाचा केविं अर्चि गजकर्ण ।
परिसुन सुखें विधि वदे
गजकर्णकथा यथार्थ आकर्ण ॥ २ ॥
अद्भुतशक्ति महीपति
सहस्रभुज कार्तवीर्य न वसुमती ।
सोडि परि जोडि मृगये
मृग वधि सुत्यजि कुसेवि नव सुमती ॥ ३ ॥
सह्याद्रिपर्वतशिखरिं
ठेवुन चतुरंगदळ दुरि विराजे ।

नृप ऋष्याश्रम पाहे
जणु कैलास जमदग्नि शिव साजे ॥ ४ ॥
ती रेणुका सती त-
द्वनिता तत्पुत्र हो परशुराम ।
पुरुषोत्तमावतार-
स्वरूप सुंदर दिसे उणा काम ॥ ५ ॥
तो परशुराम नैमिष-
वनिं निजमातापित्यां पुसुन जाय ।
मग कार्तवीर्य आश्रमिं
पाहुन जमदग्नि वंदि मुनिराय ॥ ६ ॥
उदक पिउन भूप ह्मणे
स्वगृहा जाइन वदे तयास मुनी ।
मध्यान्हसमयिं जेवुन
जा सुरभि प्रार्थि रेणुका नमुनी ॥ ७ ॥
पाचारितां नृप वसे
जेवाया सपरिवार साश्चर्य ।
मुनिस पुसे कोठुन हें
पुरवि वदे कामधेनु मुनिवर्य ॥ ८ ॥

नृप विपरीतार्थ वदे
आणुन मज द्यावि येव्हढी गाय ।
जेवुनि येथ मुनि वदे
हरण्या सर्वस्व पाहसी काय ॥ ९ ॥
मोठा कृतघ्न होसी
घेउन यश भूपते स्वनगरा जा ।
विपरीतार्थी होइल
नाश वदे खडबडोन मग राजा ॥ १० ॥
भिववुन किमर्थ वदसी
ब्रह्मबळ नृपापुढें असे काय ।
तव भय न मला सोडा
सेवक हो काय पाहतां गाय ॥ ११ ॥
हें परिसुन सेवकजन
सोडुन हांकून गाय चालविती ।
गोहुंकारें बर्बर
होउन नृपसेवकांस धालविती ॥ १२ ॥
धेनुजवीर वधीती
राजभट नृपासमोर संपूर्ण ।

हो गुप्त धेनु भूप
त्रासे जमदग्नितें वधी तूर्ण ॥ १३ ॥
पाहुन पतिनिधन वदे
शोकार्ता रेणुका न माराया ।
अससि निरपराधिजना
तूं योग्य पहा नराधमा राया ॥ १४ ॥
नृप सोडि रेणुकेवरि
ओढुन आकर्ण बाण एकविस ।
विकळ सती पडतां नृप
जाय गृहिं दया वदोन ये कविस ॥ १५ ॥
इकडे सती निजसुता
विकळमना रेणुका स्मरे बाहे ।
मरणदिन साधिं मम ये
वेळा नेणसि किमर्थ बापा हे ॥ १६ ॥
नैमिषवनाहुनी ये
तें परिसुन शब्द दुःखिता माय ।
पाहे पिता मृत रडे
राम न तो शोक लोकिं हो माय ॥ १७ ॥

त्या ति वदे निःशेष
क्षत्रियसंहार एकविसवार ।
एकविसवार गडि शर
मारि न ह्मणतां नयें कविस वार ॥ १८ ॥
धन्य तरि च तूं मत्सुत
मरतें मजवांचुनी न हो अन्या ।
धन्या दत्तात्रेया
करिं उत्तरकार्य आणुन अनन्या ॥ १९ ॥
हें वदुन रेणुका असु
सोडि रडे राम सुगुण आठवतां ।
अत्रिज पावे करि त-
न्मुखें क्रियाकर्म धर्म सांठवतां ॥ २० ॥
षष्ठदिनिं राम मारी
व्याघ्रभयें रेणुकेस हांकेला ।
ये ती व्यंगा पाहुन
दत्त वदे घात काय 'हा केला ॥ २१ ॥
मात्राज्ञेनें प्रविशे
कैलासा राम तेथ शिव नमुनी ।

स्तवि सविधि कथि षडक्षर-
मंत्र ह्मणे नुवगणें गणेश मुनी ॥ २२ ॥
शंभूक्त राम कृष्णा-
तटिं तप करि वरद एकविसवार ।
वरपरशु दे ह्मणे कर
निःक्षत्रियभू नयें कविस वार ॥ २३ ॥
देउन वर लंबोदर
हो गुप्त गणेश मंदिरीं स्थापी ।
नाम परशुराम पावे
राम परशु वधि सहस्रभुज पापी ॥ २४ ॥
निःक्षत्रियभू द्विजसात्
वरदवरें करुनि एकविसवेळ ।
ये कवि सवे लघुपणा
द्याया ध्याया न एक विसवेल ॥ २५ ॥
द्रुहिण कथि परशुराम
क्षेत्रिं मयूरेश्वरीं करी तप हा ।
जेथ मयूरारूढ
प्रकटे कमलासुरार्थ वरद महा ॥ २६ ॥

हा परशुराम साक्षा-
न्नारायण कोण तत्पराक्रम तो ।
वर्णील सोमकांता
सार परिस सुदिन तत्परा क्रमतों ॥ २७ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
गोड विसावा रसाळ अध्याय ॥ २० ॥

श्रीस्कंदोत्पत्ति कथी
एकविसावा उपासनाध्याय ।
बर्हिस्वप्रतपत्रे-
रित शिवनंदन अमंद कवि गाय ॥ २१ ॥
ब्रह्मा ह्मणे पराशर-
पुत्रा परिसें पुढें गणेशकथा ।
सुर तारकासुरार्त
क्रमितां दिन काय हो व्यथा सुपथा ॥ १ ॥

तप तारकासुर तपे
तोषुन वर मीं दिला तया तूर्ण ।
तुज कोणि शिवसुताविण
न वधिल वरिशील भाग्य सुख पूर्ण ॥ २ ॥
घे इंद्रपद विजयि हो
तारक दुःखार्णवीं सुरौघ बुडे ।
गिरिगव्हरिं शिव तप करि
शेषिं हरि क्षीरसागरीं पहुडे ॥ ३ ॥
स्तवितां वरद सुर नभो-
वाणी दे अभयवचन संपूर्ण ।
यत्न शिवाशिवयोगें
करा सुतोत्पादनार्थ हो तूर्ण ॥ ४ ॥
कैलासा जाउन सुर
पाहति एकलि शिवा अवस्था न
वरि ते तदुक्त गिरिवन
धुंडुन तिस सांगती शिवस्थान ॥ ५ ॥
धरि रूप भिल्लिणीचें
सुंदर शिवसुंदरी महाभागा ।

ध्यानस्थशिवा पाहुन
वदे वरा कारणार्थ उठवा गा ॥ ६ ॥
स्तवितां सुर बोले हो
मकरध्वज सिद्ध मजसह वसंत ।
द्यावा सवसंत निघे
वनिं कौतुक दावि मोहि शिव संत ॥ ७ ॥
चळतां ध्यान करि मदन
भस्म शिव तृतीयनेत्र हो उघडी ।
ब्रह्मांड जाळि जणु सुर
ह्मणाति शिवे कांत शांत होउ घडी ॥ ८ ॥
स्तवितां नानापरि शिव
भिह्ली आलिंगि पुष्टबैलासीं ।
आरूढला भवानी-
संगिं रमे जाय तुष्ट कैलासीं ॥ ९ ॥
एकांतसुरत होतां
जाति शतावधिसमा सुराचार्य ।
बुद्धि वदे अनल अतिथि
धाडा पाडा वियोग हो कार्य ॥ १० ॥

अनल सकाषायांबर
हो विप्र वदे भिडोन शिवगेहीं ।
देहि भवति भिक्षामिति
एकिकडे शिवसती मग सरे ही ॥ ११ ॥
मग आणी शिव रेतो-
भिक्षा गिळि अतिथि अग्नि ते पोळी ।
भूवरि पडतां करितें
ब्रह्मांडाचि शिवरेत रांगोळी ॥ १२ ॥
करि कष्टिं गर्भधारण
न्हाउन अबला विलोकि पावक सा ।
भजति विवस्त्रा तदुदरिं
घाली समभागगर्भ तो सहसा ॥ १३ ॥
पतिच्या धाकें अबला
गंगातटिं कृत्तिका मिळोनि सहा ।
गंगेंत गर्भ टाकिति
एकवटुन तेथ दिव्य हो सुत हा ॥ १४ ॥
शिववीर्यतप्तगंगा
टाकि शरस्तंभिं गर्जना करितें ।

बाळ कथी नारद मुनि
वाटे पाहून शंभुसुंदरितें ॥ १५ ॥
शिवशुक्रोद्भव नंदन
जो द्वादशभुज षडानन विलोकी ।
निजसुरतज पाजुनि ये
घेउन अंबा शिवांतिकीं तो कीं ॥ १६ ॥
धांवति कैलासा मग
ह्मणती गंगाग्निकृत्तिका मम हा ।
नंदन वंदन करुनी
पाजि शिवा वरिति हर्ष देव महा ॥ १७ ॥
शिवपुत्रोत्साहा ये
इंद्र ससुर हरि सपुत्र येति पहा ।
सावित्री लक्ष्मी शचि
अक्षयवाणें भरून तार्टि महा ॥ १८ ॥
मग पुत्रसोहळा हिम-
नगबाळा भोगि एकदिन नमुनी ।
तो शंकरा वदे कथिं
मज विजयोपाय कार्तिकेय मुनी ॥ १९ ॥

सिद्धिदगणपतिपार्थिव
तूं श्रावणसितचतुर्थिला तूर्ण ।
आरंभ भाद्रपदसित-
चतुर्थिला शिव वदे करीं पूर्ण ॥ २० ॥
शिव उपदेशि षडक्षर-
मंत्र जपे स्कंद वरदवर पावे ।
स्थापी लक्षविनायक
जो निजवाहन मयूर दे भावें ॥ २१ ॥
नाम मयूरध्वज हें
यावे षण्मुख तसेंच तें नाम ।
स्कंदतपःस्थल पावे
लक्ष्यनगर पुरवि जें सकलकाम ॥ २२ ॥
बसुन मयूरावरि हो
हरगौरी नमुनि देवसेनानी ।
करि समर लक्ष वर्षें
असुर पराभवि असंख्य सेनांनीं ॥ २३ ॥
हो गणपतिप्रसादें
स्कंद विजयि मारि तारकासुर तो ।

पुरतो गणेशमहिमा
कवि आत्माराम गाय सासु रतो ॥ २४ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
एकविसावा रसाळ अध्याय ॥ २१ ॥

---

श्रीवरदमूर्ति गौरवि
बावीसावा उपासनाध्याय ।
शितिगलनिजातपत्रे-
रितमंगलमूर्तिकीर्ति कवि गाय ॥ २२ ॥
श्रोते हो परिसावें
व्यास पुसे कमलजास मुनिराय ।
रतिनें केलें मन्मथ
जाळीतां भोगिभूषणें काय ॥ १ ॥
विधि बोले स्तवितां शिव
रतिस वदे तूं भिऊं नको काम ।

स्मृतमात्र दृष्टिगोचर
होईल मनोजसंज्ञ अभिराम ॥ २ ॥
संतोषुनी पुन्हा शिव
रतिस वदे करिल हेतु परिपूर्ण ।
कृष्णावतारिं तव पति
जन्मुनि तो कृष्णशक्त्युदरिं तूर्ण ॥ ३ ॥
मग तुष्ट शिव अनंगा
उपदेशि गणेशमंत्र तो पावे ।
वरद तनुदान द्यावें
मदन वदे मजवरी न कोपावें ॥ ४ ॥
बाहोन गणेश ह्मणे
बा न भिणें काय तुज उणें सांग ।
प्रद्युम्न रुक्मिणीसुत
होशिल कृष्णावतारिं तूं सांग ॥ ५ ॥
होतिल वसंत शशि तव
सहाय हें वदुन गुप्त हो वरद ।
स्थापि महोत्कटनामें
मूर्ति मदन पावण्या गणेशपद ॥ ६ ॥

हे व्यास गणेशकथा
परिसुन पूजुन पुसे विधिस शेष ।
तो स्थापि एकदंता
किमर्थ हें मज निवेद निःशेष ॥ ७ ॥

विधि बोले व्यासा शिव
पूजिति कैलासिं मिळुन सुर सर्व ।
तैं शेष वदे इतरा
न भजें पर पुरुष मीच धरि गर्व ॥ ८ ॥

हें कळतां शिव आपटि
भूवरि धरि शेष पुच्छि तो फिरवी ।
भंगे सहस्रधा शिर
देवा साहे न गर्व जो मिरवी ॥ ९ ॥

मग नारदमुनि शेषा
उपदेशि गणेशमंत्र बापा हा ।
तप करि शेष वरद या
बोले भक्ताभिमानि बा पाहा ॥ १० ॥

होशिल सहस्रभागें
भिन्नमुख धरीशिल प्रसन्नमुख ।

एकावर भू यावत्
शशिरवि तनु धरुन वरिशिल स्वसुख ॥११॥

सांनिध्य मजसह सदा
तुज होइल हरिहरांशिं वदुन असें ।
मग वेढला परिकरा
व्यालोदर यावरून ह्मणवितसे ॥ १२ ॥

दशशतशिरीं वरद कर
ठेवुन हो गुप्त वरद तो स्थापी ।
धरणीधरमूर्ति उरग
सुंदरमंदिरिं तरे भजुन पापी ॥ १३ ॥

परिसून गणेशकथा
विनयान्वित मोक्षदायिनी व्यास ।
विधिस वदे सांग पुढें
विधि बोले सत्यवत्यपत्यास ॥ १४ ॥

मी पूर्वि सृष्टि करितां
सुत मानस निर्मिं त्यांत कश्यप हा ।
कर्मविधिज्ञानतपो-
धर्म सकल जाणता अवश्य पहा ॥ १५ ॥

हे व्यास गणेशकथा
परिसुन पूजुन पुसे विधिस शेष ।
तो स्थापि एकदंता
किमर्थ हें मज निवेद निःशेष ॥ ७ ॥

विधि बोले व्यासा शिव
पूजिति कैलासिं मिळुन सुर सर्व ।
तैं शेष वदे इतरा
न भजें पर पुरुष मीच धरि गर्व ॥ ८ ॥

हें कळतां शिव आपटि
भूवरि धरि शेष पुच्छि तो फिरवी ।
भंगे सहस्रधा शिर
देवा साहे न गर्व जो मिरवी ॥ ९ ॥

मग नारदमुनि शेषा
उपदेशि गणेशमंत्र बापा हा ।
तप करि शेष वरद या
बोले भक्ताभिमानि बा पाहा ॥ १० ॥

होशिल सहस्रभागें
भिन्नमुख धरीशिल प्रसन्नमुख ।

एकावर भू यावत्
शशिरवि तनु धरुन वरिशिल स्वसुख ॥११॥
सांनिध्य मजसह सदा
तुज होइल हरिहरांशि वदुन असें ।
मग वेढला परिकरा
व्यालोदर यावरून ह्मणवितसे ॥ १२ ॥

दशशतशिरीं वरद कर
ठेवुन हो गुप्त वरद तो स्थापी ।
धरणीधरमूर्ति उरग
सुंदरमंदिरिं तरे भजुन पापी ॥ १३ ॥

परिसून गणेशकथा
विनयान्वित मोक्षदायिनी व्यास ।
विधिस वदे सांग पुढें
विधि बोले सत्यवत्यपत्यास ॥ १४ ॥

मी पूर्विं सृष्टि करितां
सुत मानस निर्मिं त्यांत कश्यप हा ।
कर्मविधिज्ञानतपो-
धर्म सकल जाणता अवश्य पहा ॥ १५ ॥

देऊन गणेशाची
पुत्रस्नेहें उपासना मर्म ।
कथिलें गणेश पावे
माग वदे वर विलोकि सत्कर्म ॥ १६ ॥
कश्यप वदे तव पद-
स्मृति नित्य असो मदात्मज असें तूं ।
ह्मणवुन सृष्टि कराया
दे शक्ति ह्मणे तथास्तु भवसेतु ॥ १७ ॥
हो गुप्त वरद कश्यप
ये गृहिं दक्षात्मजा महोत्साहें ।
वनिता त्रयोदश वरी
क्रीडे विस्तारि सृष्टि लवलाहें ॥ १८ ॥
अदिति श्रेष्ठा वनिता
इच्छी रतिकाळिं सुत सुर प्रसवे ।
रति दिति अकाळिं मागे
सुत दैत्य वि गाति वेद विप्र सर्वे ॥ १९ ॥
कीटपतंगोरगपशु-
दानवदितिपुत्रयक्षगंधर्व ।

पर्वतशैलाद्यभिनव
सर्ग समुत्पन्न होतसे सर्व ॥ २० ॥
पाहून आत्मसंभव-
सृष्टि सुतां वाहुनी वदे हर्षें ।
गजकर्ण उपासावा
पय जो कल्याण मेघसा वर्षे ॥ २१ ॥
त्यांलागिं मंत्र सांगे
शोधून ऋणारिचक्र उपदेश ।
मंत्राचा घेति करिति
तप त्यजुन दिव्यवर्ष भयलेश ॥ २२ ॥
पावे वरद स्तवितां
वर दे हो गुप्त हेतु परिपूर्ण ।
ठेउन अनंतनामें
स्थापिति ते मूर्ति मंदिरीं तूर्ण ॥ २३ ॥
सुमुखैकदंत कपिला-
भिध गजकर्णक तथैव नाम पहा ।
लंबोदर विकट तथा
सुविघ्ननाशाख्य हो गणाधिप हा ॥ २४ ॥

तो धूम्रकेतु पावे
नाम गणाध्यक्ष भालचंद्र तथा ।
अंतिं गजानन बारा
नामें अघ हरिति लावती सुपथा ॥ २५ ॥

व्यासा ब्रह्मा सांगे
तेंची भृगु वर्णि सोमकांतनृपा ।
तेंचि यथामति तुह्मा
कथिलें परिसुन करी गणेश कृपा ॥ २६ ॥

श्रीमद्गणेशलीला-
मृतखंड उपासनाख्य कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
बावीसावा रसाळ अध्याय ॥ २२ ॥

---

इतिश्रीमन्मयूरात्मच्छत्रोरंत-
गणेशलीलामृतउपासनाखंड ।

---

॥ श्रीगणेशाय नमः ॥

# अथ श्रीमन्मयूरात्मच्छत्रेरित-

# गणेशलीलामृत.

## क्रीडाखंड

### आर्या.

श्रीवरद सुरनरांतक-
जन्म कथी प्रथम उत्तराध्याय ।
बर्हिस्वच्छत्रेरित
कविनायक का विनायक न गाय ॥ १ ॥

कोणि नरांतक आणी
देवांतक दुष्ट ते असुर वधिले ।
जे लोकिं धर्महिंसक
सौतिक पौराणिका पुसे वहिलें ॥ १ ॥
ऐकुन वक्ता बोले
विधिला पाराशराख्य हि तसा च ।

पूर्वीं प्रश्न पुसे जो
कथितों तुज तो च ऐक हित साच ॥ २ ॥
विधि बोले मन्मानस-
पुत्र जितेंद्रिय गुणज्ञ कश्यप हा ।
वरि तेरा दक्षसुता
अदिति ज्येष्ठा सती अवश्य पहा ॥ ३ ॥
दितिसुत विजयी निजसुत
हृतभाग्य विलोकि अदिति वर मागे ।
परमात्मा हो निजसुत
तिस मंत्र विनायकाख्य पति सांगे ॥ ४ ॥
अष्टभुजविनायक वनिं
तप करितां अदिति हेतु करि पूर्ण ।
बोलुन तथास्तु तच्छिरिं
कर ठेवुन वरद गुप्त हो तूर्ण ॥ ५ ॥
श्रोते ह्मणती वक्तया
कथिं देवांतकनरांतकाख्यान ।
वक्ता सांगे नारद-
कथित करा श्रवण तें सबहुमान ॥ ६ ॥

अंगजनपदीयनगरिं
एक वसे रौद्रकेत्वभिध विप्र ।
ते त्याच्चि शारदाख्या
प्रसवे भार्या सुतद्वय क्षिप्र ॥ ७ ॥
हर्षे तेजस्वी सुत
पाहुन आजानुबाहु तन्नाम ।
ठेवि द्विज देवांतक
नरांतक असें कृती पुरवि काम ॥ ८ ॥
कथि शिवषडक्षरमहा-
विद्या नारदमुनींद्र दोघांतें ।
मागति शिवा प्रसन्ना
वर साधुन नियतिच्या सदोघातें ॥ ९ ॥
निशिदिन जय अभय सुरा-
सुरनरजीवांहुनी असो राज्य ।
त्रैलोक्यिचें शिव ह्मणे
तथास्तु हो गुप्त हर्म्य त्यां प्राज्य ॥ १० ॥
भूपाताल नरांतक
देवांतक जिंकि नाक भू सरय ।

विनवि विधिस होय नभो-
वाणी दे प्रार्थितां तया अभय ॥ ११ ॥
कश्यपगृहिं अवतरुनी
दुष्टहनन अवनसाधुंचें करिन ।
ऐकुन विधि भूस वदे
भार विनायक हरील भय धरिं न ॥ १२ ॥
मध्यान्हि अदित्युदरीं
माघसितचतुर्थिला विनायक तो ।
जन्मे असतां उच्च-
ग्रहपंचक सुयश कोण नायकतो ॥ १३ ॥
हो सिद्धिबुद्धिसंयुत
दशबाहु सुमूर्ति अष्टवर्षांची ।
प्रकट सतीप्रार्थितशिशु
गणना करवे न कविस हर्षांची ॥ १४ ॥
दुष्ट भयें कांपति बहु
आनंदति भक्त देव गंधर्व ।
नाचति दुंदुभि वाजति
कश्यप गृहिं मांडि थोर सुखपर्व ॥ १५ ॥

श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्य खंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
पहिला रसभरित गोड अध्याय ॥ १ ॥

---

श्रीगणपतिकृतविरजा-
दिवध दुजा वर्णि उत्तराध्याय ।
स्वशिखिच्छत्रेरित कवि
जो खळ वधि साधु पाळि तो गाय ॥ २ ॥

अदितिस वसिष्ठ सांगे
द्वात्रिंशल्लक्षणान्वित सुत पहा ।
उत्पात यास होतिल
वारील सवे हरील भूभर हा ॥ १ ॥
शिशुस नमुनि मुनि जातां
त्या अंगणिं अदिति एकदिन जपुनी ।
मृद्वास्तरणि निजवितां
विरजाभिधराक्षसी गिळी टपुनी ॥ २ ॥

पीतां जळ तत्कुक्षित
शूल उठे प्राण सोडि बाळ निघे ।
फोडुन तदुदर खेळे
वर कळतां माय त्यास हर्षुनि घे ॥ ३ ॥
कश्यप अदिति विनोदें
अर्चिति गणनाथ बाळका जपती ।
उद्धत धुंधुर दोघे
शुकवेषें असुर साधण्या टपती ॥ ४ ॥
माते पुसून उतरे
महोत्कट कडेवरून पोपट ते ।
आंवळितां मान मरति
अदिति ह्मणे साधुवाक्य हो पटतें ॥ ५ ॥
एकदिन पर्वकाळीं
जाय स्नानार्थ अदिति कासारीं ।
नक्र महोत्कट कवळी
तटिं ओढुन वरद आपटुन मारी ॥ ६ ॥
तैं एक तैजस पुरुष
निघे कथी नमुनि चित्ररथनामा ।

अवमानिला भृगु अभय
दे शापि तसें घडे खळविरामा ॥ ७ ॥
नमुनी महोत्कटा मग
निजालया जाय हृष्ट गंधर्व ।
अदिति ससुतशिष्य गृहा
पतिस कथी सर्व मानि सुखपर्व ॥ ८ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
ज्ञाभिध पुराणसंमत
दुसरा रसभरित गोड अध्याय ॥ २ ॥

---

श्रीवरद मोहि हाहा-
हूहु तिजा वर्णि उत्तराध्याय ।
आत्माराममयूर-
च्छत्रेरित विश्वरूप कवि गाय ॥ ३ ॥
शिवदर्शनार्थ हाहा-
हूहू गंधर्व जाति ते वाटे ।

कश्यपगृहिं जाळि वरद
तत्पंचायतन हो नवल वाटे ॥ १ ॥
ध्यान विसर्जुन पाहति
पंचायतना पुढें न गंधर्व ।
साश्चर्य पुसति ऋषितें
विनायकापाठिं लागती सर्व ॥ २ ॥
दावून धाक पुसतां
नेणें बाळक वदे स्वमुख पसरी ।
मातापित्यां स्वतांसह
दावि मुखीं विश्वरूप रुदन करी ॥ ३ ॥
भासे क्षणांत हरिहर
पळ रविदुर्गा विराट् विनायक तो ।
गंधर्व होति विस्मित
वरदकथा कोण सुकवि नायकतो ॥ ४ ॥
गंधर्व त्यास पूजुन
जाती शिवदर्शनार्थ लवलाहें ।
कश्यप हर्षें डोले
अदिति स्वमनीं अनंतसुख लाहे ॥ ५ ॥

श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
तिसरा रसभरित गोड अध्याय ॥ ३ ॥

---

श्रीमद्विनायकव्रत-
वंध कथी तूर्य उत्तराध्याय ।
आत्ममयूरच्छत्रे-
रित कवि भवबंध नाशि गुण गाय ॥ ४ ॥

मग बैसतां स्वतनया
महोत्कटालागिं पांचवें वर्ष ।
व्रतबंधन आरंभी
कश्यप सुमुहूर्ति मानुनी हर्ष ॥ १ ॥
असुरमहापुंड्राभिध
पिंगाक्ष विशाल पिंगल विघात ।
द्विजगणिं बैसुनि बटुवर
टाकिति गुप्तास्त्रभार हो घात ॥ २ ।

जाणुन कपट महोत्कट
टाकी मंत्रोन अक्षताभार ।
असुर पडतां करिति सुर-
नर जयजयकार हो चमत्कार ॥ ३ ॥
सावित्र्यादि सती त्या
महोत्कटा घालिती प्रथम भिक्षा ।
दे ब्रह्मणस्पति असें
नाम कमंडलु वसिष्ठ गुरुदीक्षा ॥ ४ ॥
उत्तमबुद्धि बृहस्पति
दे ठेवी भारभूति हें नाम ।
अर्पि धनद निजमाला
ठेवि सुरानंद नाम अभिराम ॥ ५ ॥
दे वरुण पाश सर्व-
प्रिय नाम महेश शूल तो अर्पी ।
नाम विरूपाक्ष शशी
स्वकला भालेंदु नाम दे तर्पी ॥ ६ ॥
दे परशु उमा ठेवी
नाम परशुहस्त सिंह वाहन दे ।

नंदी मुक्तामाला
मालाधर नाम ठेवि आनंदें ॥ ७ ॥
फणिराजासन ठेवी
नाम बसाया निजांग अहि अर्पी ।
ठेवी नाम धनंजय
दे दाहकशक्ति अग्नि त्या तर्पी ॥ ८ ॥
अद्भुतबळ अर्पि अनिल
ठेवी नाम प्रभंजन सुरेश ।
धरि गर्व सोडि बटुवर
अनिलानल भी महोत्कट न लेश ॥ ९ ॥
मग दावून महोत्कट
इंद्रातें विश्वरूप हरि गर्व ।
सर्व कला कश्यप निज-
सुता शिकवि वरि सभार्य सुखपर्व ॥ १० ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
चवथा रसभरित गोड अध्याय ॥ ४ ॥

श्रीवरदवास काशी-
पतिगृहिं कथि पंचमोत्तराध्याय ।
केकिस्वच्छत्रेरित
कवि काशीविश्वनाथ शिव गाय ॥ ९ ॥

कश्यप पुरोहितपणा
काशीराजगृहिं जाय मागाया ।
नृप कथि ममगृहिं करिं शुभ-
कार्य वदे सुमुनि ने मम सुता या ॥ १ ॥

अदितीस पुसुन जातां
नरांतकपितृव्यरौद्रकेत्वनुज ।
धूम्राक्षाख्य असुर पथिं
तपतां वधिला विनायकें सहज ॥ २ ॥

तत्सुत मनुजघन उडविं
वरदश्वासें नरांतक असुर ते ।
पंचशत धाडि पडतां
नृपपुर लुटण्या दुजें ढकलि पुरतें ॥ ३ ॥

इकडे सविनायकनृप
शिरतां स्वपुरिं जन हर्षती सर्व ।

नागरिक़वेषि खळ वधि
भेटुन वरद नृप मानि सुखपर्व ॥ ४ ॥
असुर पतंग विधूता-
भिध गांठति वरद नृप रथारूढ ।
असतां पवन सुटे बटु
रगडि विनायक चरित्र रचि गूढ ॥ ५ ॥
वरद वधि दीर्घकाय
श्मश्रुल पिंगल असुर शिलारूप ।
पाषाणिं परशु हाणुन
शिरतां नृपगेहिं हो चकित भूप ॥ ६ ॥
उतरोन रथाखालीं
बाळा भद्रासनीं बसवि नृपती ।
पूजि सविधि जेववि नमि
कवि आत्माराम संत जो जपती ॥ ७ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
पंचम रसभरित गोड अध्याय ॥ ९ ॥

श्रीवरदसिद्धिबुद्धि-
प्राप्ति कथी षष्ठ उत्तराध्याय ।
बर्हिस्त्रातपवारण-
नोदित कवि सिद्धिबुद्धिपति गाय ॥ ६ ॥
ऋषि धर्मदत्तनामा
निजगृहिं कश्यपसखा महोत्कट तो ।
पुसुन नृपा नेतां पथिं
कामक्रोधाख्य असुर आपटतो ॥ १ ॥
शिरतां स्वपुरिं महोत्कट
वधि मत्तेभ मुनि अर्पि निजकन्या ।
चिच्छक्ति सिद्धिबुद्धि
त्रिभुवनमान्या विनायका धन्या ॥ २ ॥
धूम्राक्षसती जृंभा
नामें असुरी महोत्कटा घाली ।
अभ्यंग विषें मोही
धाडि विनायक यमालया व्याली ॥ ३ ॥
मग काशीराजा रथिं
घालुन ने स्वनगरा विनायक तो ।

कौतुक दावि निजजना
वरदकथा कोण सुकवि नायकतो ॥ ४ ॥
व्याघ्रमुख ज्वालामुख
दारुण हे पातले तिथे असुर ।
एक गिळी जन पोळी
दुजा तिजा कांपवी समस्त पुर ॥ ५ ॥
व्याघ्रमुखा चिरुन गिळी
प्रलयाग्नि मृता जना महोत्कट तो ।
उठवि नगर करि जयजय-
कार कवि गणेशगायनीं झटतो ॥ ६ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
साहावा हा रसाळ अध्याय ॥ ६ ॥

---

श्रीवरद कूपकंदर
वधि हें कथि सप्तमोत्तराध्याय ।

शितिकंठस्वच्छंत्रे-
रित कवि भवकूपमग्न हित गाय ॥ ७ ॥
प्रातःकाळिं वदे नृप
विनायका जेविं तो ह्मणे उदर ।
भरलें कोठ पुसे नृप
तो कथि जो नाशि भक्तपापदर ॥ १ ॥
दंडकवनिं नामलपुरिं
ममभक्त मला भ्रुशुंडि नैवेद्य ।
अर्पि विवाहार्थ तया
आण नृप निमंत्रि ये न भववैद्य ॥ २ ॥
जाय विनायकवचनें
भूप पुन्हा ये भ्रुशुंडि हे मम न ।
आराध्यमूर्ति ह्मणतां
प्रकटे सहसिद्धिबुद्धि गजवदन ॥ ३ ॥
ऋषि संतोषुनि जातां
बोले असुर प्रभातिं करि कपट ।
राया विनायक गृहीं
असतां तुज बहु अपाय हो प्रकट ॥ ४ ॥

मग राजमुद्रिका करिं
धरुनि विनायक पुसे असे काय ।
मुष्टित असुर गडबडे
हाणि विनायक न भी महाकाय ॥ ५ ॥
द्वेषें धाडि नरांतक
गौरवुनी असुर कूपकंदर ते ।
गिळितां कूपिं बुडवितां
रगडि विनायक न जाशि मंद रते ॥ ६ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
सप्तम रसभरित गोड अध्याय ॥ ७ ॥

---

श्रीवरद मोहि सनका-
दिक हें कथि अष्टमोत्तराध्याय ।
नीलगलनिजच्छत्रे-
रित वरद महोत्कटाख्य कवि गाय ॥ ८ ॥

ऐकून कूपकंदर-
वध देवांतकनरांतका प्रणती ।
करुनी अंधक अंभो-
धर तुंग असुर वधूं रिपुस ह्मणती ॥ १ ॥
काशीपतिपुरिं अंधक
पाडी तो अंधकार वर्षि पय ।
अंभोसुर तुंग उडे
सपक्ष नग हो जना गमे प्रलय ॥ २ ॥
द्विज होउन वट निर्मुनि
लक्षि असुरकपट हो वटारूढ ।
चंचुपुटिं दोंस पदिं नग
रगडि विनायक चरित्र रचि गूढ ॥ ३ ॥
अंभोसुरमाता ये
काशीपतिपुरिं धरी अदितिरूप ।
पाहे रगडुं विनायक
तो तिस वधि होतसे चकित भूप ॥ ४ ॥
नृपगृहिं सनकसनंदन
मुनि येती देखण्या महोत्कट ते ।

मोदक खातां पाहुन
ह्मणती न ब्राह्मणत्व या घटतें ॥ ५ ॥
मग पौरजन महोत्कट
निमंत्रिती भोजना द्विज हि तेवीं ।
जो शुक्लवृत्ति सेवी
आधिं विनायक तदालयीं जेवी ॥ ६ ॥
जन ह्मणति अह्मांवांचुन
दरिद्रगृहिं जेवणें उचित काय ।
धरुनी असंख्य रूपें
जेवि वरद चकित होति मुनिराय ॥ ७ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंडिं कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
अष्टम रसभरित गोड अध्याय ॥ ८ ॥

श्रीवरदशमीगौरव-
कारण कथि नवम उत्तराध्याय ।

स्वकलापिच्छत्रेरित
मांदारशमीचरित्र कवि गाय ॥ ९ ॥

होता प्रियव्रतनृपति
तद्भार्या कीर्ति मोठि नावडती ।
आवडति धाकुटि तया
प्रभा रमवि जेविं कानना वड ती ॥ १ ॥

व्रत देवल ऋषि कीर्तिस
कथि तुज होइल वदे सुत न वांचे ।
वांचविल वरद न कळत
ती वाहि शमी अभाविं दूर्वांचे ॥ २ ॥

स्वप्निं वदे वरद तुला
वश होइल पति उदेलि सवतीस ।
रक्तपिती पतियोगें
प्रसवे सुत कीर्ति हर्ष नव तीस ॥ ३ ॥

दे विष चवथे वर्षी
कीर्तिसुता सवत गृत्समदवचनें ।
अज्ञातशमीपूजन
फलदानें मृत उठे सुत शुचिमनें ॥ ४ ॥

कीर्ति ह्मणे मुनिस शमी-
महिमा सांगा मला कृपा करुनी ।
प्रिय कां शमी गणेशा
तें आख्यान वदतों वदे सुमुनी ॥ ५ ॥
धौम्यसुत शौनकाचा
शिष्य गुणी ह्मणति ज्यास मांदार ।
और्वमुनिची कन्या
शमी वरी तो कृती महोदार ॥ ६ ॥
येतां भ्रुशुंडि आश्रमिं
मांदारशमी करीति उपहास ।
व्हा वृक्ष असें बोले
भ्रुशुंडि पावे तरुत्व दोघांस ॥ ७ ॥
श्वशुरगुरुराज और्व
शौनक तप करिति वरद तो पावे ।
बोले मांदारशमी
मज वाहति ते कदा न लोपावे ॥ ८ ॥
ब्रह्मा यज्ञारंभीं
न पूजितां रुष्ट हो क्षणिं गणेश ।

सावित्रीशापमिषें
देव नद्या होति संशय न लेश ॥ ९ ॥
देवस्त्रिया विनवितां
उपदेशि गणेशमंत्र विधि तूर्ण ।
सुर गणपतिप्रसादें
तें पूर्वस्थान वरिति संपूर्ण ॥ १० ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
नववा रसभरित गोड अध्याय ॥ ९ ॥

---

श्रीवरदकृतदुरासद-
दमन कथी दशम उत्तराध्याय ।
बर्हिस्त्वप्रतपत्रे-
रित कामद कामरिपुज कवि गाय ॥ १० ॥
तप करितां संतोषुन
भस्मासुरसुतदुरासदा शिव दे ।

त्रैलोक्यवैभव अभय
मर्यादा सोडितां विनाश वदे ॥ १ ॥
जिकून देवमानव
असुर त्रैलोक्यवैभवें डोले ।
जिंकशिल धन्य होशिल
जरि काशीक्षेत्र मंत्रिगण बोले ॥ २ ॥
काशी जिंकि दुरासद
केदारीं शिव वसे बुडे धर्म ।
स्तविती सुर वरद नभो-
वाणी गर्जोन देतसे शर्म ॥ ३ ॥
शिवशक्तीहुन होउन
दुःख हरिन दिव्यतेज मग निपजे ।
दशभुज सुभग विनायक-
मूर्ति उमांगाहुनी सुरौघ भजे ॥ ४ ॥
निजवाहन पंचानन
अंबा दे असुर पांवुनी समरा ।
परते धाडि बहुतसे
भट न विनायक ह्मणे तयांस मरा ॥ ५ ॥

षट्पंचाशद्रूपें
दशभुज षड्हस्त अष्टबाहु धरी ।
नानावाहनिं बैसुन
सर्व विनायक वधी असुर निकरीं ॥ ६ ॥

पळतां भयें न वधितां
धरि भस्मासुरसुता बळें स्थापी ।
काशीपुरिं शिरिं पद दे
वरद शिववर स्मरोन अद्यापी ॥ ७ ॥

काशीपुरीं विराजति
षट्पंचाशद्गणेशमूर्ति पहा ।
हें आख्यान परिसतां
सुख हो संसारिं सरति कष्ट महा ॥ ८ ॥

श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
दाहावा हा रसाळ अध्याय ॥ १० ॥

श्रीयुक्तदिवोदासा
गौरवि एकादशोत्तराध्याय ।
शितिगलनिजातपत्रे-
रित निर्गुणसगुणधुंडि कवि गाय ॥ ११ ॥

कीर्ति पुसे गृत्समदा
शंकर कां काशिकापुरी सोडी ।
गृत्समद ह्मणे जन हो
दीन अनावृष्टिजन्यभय जोडी ॥ १ ॥
बहुदिवस तप करीत्या
रविकुलजा विधि वदे दिवोदासा ।
राज्य करिं वदे द्यावी
काशीपुरि तो वदे विधिस सहसा ॥ २ ॥
विधि जाय तथास्तु ह्मणुन
धाडि शिवा मंदराचला शिव तो ।
देवप्रार्थित उद्धरि
मरीचितें यत्तपें शिवहि निवतो ॥ ३ ॥
इकडे होउन रविशशि-
वरुणानल रक्षि जन दिवोदास ।

हो सगण मंदराचलिं
काशीविरहानलें शिव उदास ॥ ४ ॥
शिव पाठवि मोहाया
भैरवदिक्पतिसुरर्षि काशीतें ।
चाले उपाय न वदे
वरदा मम विरहदुःख नाशीं तें ॥ ५ ॥
ज्योतिर्विद होउन मग
काशीतें जाय धुंडिराज पहा ।
प्रश्न विविध कथि मोहति
नरनारी पाहतां भुले नृप हा ॥ ६ ॥
आजहुनी सतरावे
दिनिं येइल एक काशिके विप्र ।
जोशि वदे राया कर
तदुक्त वर्तविं तसे जन क्षिप्र ॥ ७ ॥
धुंडी भट शिवदर्शन-
काम निघे विष्णु काशिके पावे ।
साकार बौद्धरूपी
त्यजुन ह्मणे ब्रह्म निर्गुण भजावें ॥ ८ ॥

मग जारकर्मशाला
कमळा मेळवुन बायका माडी ।
बौद्ध भट वदे वाढे
पाप नृपा राज्य जा तपा सांडीं ॥ ९ ॥
हें वदुन चतुर्भुज हो
हरि धुंडिभटोक्त भूप आठवितो ।
शिव काशिके सगण ये
स्वपदिं दिवोदास भक्त पाठवितो ॥ १० ॥
मग गंडकीशिलामय-
धुंडीमूर्ति शिव काशिके स्थापी ।
भजतां भौमिं वदे हो
शुचि माघासितचतुर्थिला पापी ॥ ११ ॥
मुनिवचनें कीर्ति शमी-
दूर्वांकुरिं पूजि धुंडि काशीतें ।
हो व्रत सफल सुतासह
ये गृहिं पतिविरहदुःख नाशी तें ॥ १२ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।

स्वाभिध पुराणसंमत
अकरावा हा रसाळ अध्याय ॥ ११ ॥

श्रीमद्विनायकप्रिय-
लोक कथी द्वादशोत्तराध्याय ।
बर्हिस्त्वच्छत्रेरित
कवि लोकातीत लोकहित गाय ॥ १२ ॥

व्यास पुसे धाता कथि
काशीपतितें गणेशलोककथा ।
मुद्गल जी सांगे ती
कवि आत्माराम लावि जन सुपथा ॥ १ ॥
काशीपतिगृहिं लीला
रचि देवांतकनरांतक वधितसे ।
निजधाम वरि हरुन भू-
भार विनायक उदास भूप वसे ॥ २ ॥
मग मुद्गलमुनि येतां
नृपति पुसे एकदंत बा पाहा ।

सेवीन चर्मदेहा-
समवेत सदापि केविं बापा हा ॥ ३ ॥
आहे विनायकाचा
लोक कवण मुनिवरा मला सांग ।
मुद्गल वदे नृपातें
कपिलाहुन ऐकलें परिस सांग ॥ ४ ॥
इक्षुसमुद्रीं एके
द्वीपिं वरद सिद्धिबुद्धिसहित वसे ।
कामद इत्यादि वदुन
मुद्गल हो गुप्त नृप तपास बसे ॥ ५ ॥
पावे गणपति पाठवि
विमान सिंहासनीं स्वसुत राय ।
बैसवि विमानिं बैसुन
विनयान्वित इक्षुसागरा जाय ॥ ६ ॥
इकडे विनायक घरो-
घरिं जेवि नृपोक्त ये स्वगेहातें ।
शिबिकासनिं बैसुन पथिं
देवांतकदूत फिरवि ते हातें ॥ ७ ॥

वरद पुसे कोण तुह्मी
देवांतकदूत ते असों ह्मणती ।
देवांतका कथिति तें
वृत्त करिति जन विनायका प्रणती ॥ ८ ॥

काशीपति बोले मज
विनायका त्यजुन जेवसी काय ।
प्रतिगृहिं पौर वदति तूं
जेवसि सहवरद हो चकित राय ॥ ९ ॥

श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
बारावा हा रसाळ अध्याय ॥ १२ ॥

---

श्रीवरद नरांतक वधि
तेरावा वर्णि उत्तराध्यायिं ।
स्वशिखिच्छत्रेरित कवि
वर संसाराब्धिपोतपद गाय ॥ १३ ॥

मग दूत येउनी त्या
करिती देवांतकाप्रति प्रणती ।
तो अप्रमेय केवळ
बाळ नव्हे आदिमूर्ति ते ह्मणती ॥ १ ॥
इत्यादि नरांतक परि-
सुन उठुन सभे वदे महाकाय ।
वाटे न मानवपरा-
क्रम गाया दूत हो त्रपा काय ॥ २ ॥
मग घोरयुद्ध वर्ते
नेति असुर धरुन राय बहु वीर ।
सिद्धिविनायकवचनें
निर्मि रगडि पुरुष एक रिपु धीर ॥ ३ ॥
काशीराजासह जित
नरांतका धरि विनायका अर्पी ।
पुरुष शिरे वरदमुखीं
नृप पाहे विश्वरूप मन तर्पी ॥ ४ ॥
पाहुन इच्छि विनायक-
भक्ति नरांतक तयाहुन मराया ।

झगडे असुर विनायक
रणिं मूर्छितसा पडे विषम राया ॥ ५ ॥
इतक्यांत विनायक घे
पडतां तूणीरचाप शर सोडी ।
छेदि असुरावयव परि
फुटति पुन्हा देववृंद भय जोडी ॥ ६ ॥
धरि विश्वरूप वधि खळ
वरद स्त्रीपुंनपुंसकाकार ।
स्मरुनी शिववर सुरगण
करि जयजयकार हो चमत्कार ॥ ७ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
तेरावा हा रसाळ अध्याय ॥ १३ ॥

---

श्रीगणपतिदेवांतक-
रण वर्णि चतुर्दशोत्तराध्याय ।

आत्मारामययूर-
च्छत्रेरित वरदचरण कवि गाय ॥ १४ ॥

मग रौद्रकेतुच्या तें
अंगणिं वेगें नरांतकशिर पडे ।
ध्वनि शारदा नरांतक-
माता परिसुन सरौद्रकेतु रडे ॥ १ ॥

पाहुन नरांतकाचें
शिर देवांतक रडे महाकाय ।
रायाचें पुर खपथें
वेढि नृप वदे अनर्थ हा काय ॥ २ ॥

सिंहारूढ विनायक
हो सायुध सिद्धिबुद्धिसहित निघे ।
गगनपथें सिद्धिबळें
जन्मे वीरौघ भय असुरतति घे ॥ ३ ॥

सिद्धि स्मरतां नमुनि
व्यूह रचिति अष्टसिद्धि येऊन ।
तैं कर्दमाद्यसुर बहु
पडति उठवि शुक्र लक्ष देऊन ॥ ४ ॥

जन्मून ईशितेच्या
कृत्या क्रोधाहुनी भर्गी घाली ।
त्यजि शुक्र पश्चिमदिशे
बर्बरसंज्ञा हि तेथुन निघाली ॥ ५ ॥
प्राकाम्या वशितेसह
कालांतकदानवा वधी तूर्ण ।
अणिमादिसिद्धि धांवुन
नानाविध दैत्य वधिति संपूर्ण ॥ ६ ॥
तीन दिन सुरासुररण
चाले देवांतकें सकलसिद्धी ।
केल्या जर्जर जातां
विनायका शरण धांवली बुद्धी ॥ ७ ॥
बुद्धिमुखाहुन कृत्या
जन्मुनि भक्षि असुरां भर्गी घाली ।
देवांतक सुटुन पळे
मंत्र पिता कथि तथा दया आली ॥ ८ ॥
देवांतक होमि हवनिं
सुतशिर ईश्वरवरें उठे तनय ।

कुंडांतुन अश्व निघे
पूर्ण अनुष्ठान होतसे सरय ॥ ९ ॥
देवांतक हयिं बैसुन
धांवे रणिं सिद्धिवृंद दूर पळे ।
सिंहारूढ विनायक
झगडे सुरसैन्य मोहि असुर पळें ॥ १० ॥
देवांतक त्रिकोणी-
कुंडीं होमि नरमांस मग देवी ।
प्रकटे कुंडांतुन घे
अंकीं देवांतका गगन सेवी ॥ ११ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
चवदावा हा रसाळ अध्याय ॥ १४ ॥

---

श्रीगणपति देवांतक
वधि कथि पंचदश उत्तराध्याय ।

आत्ममयूरच्छत्रे-
रितकवि देवांतकांतका गाय ॥ १९ ॥

मग काशीपति उठवी
विनायका यश ह्मणे सुरां यो जी ।
हो जागृत सुरसेना
घंटास्त्र खगास्त्र जें वरद योजी ॥ १ ॥
लक्षावधि पक्षि असुर-
सेना खंडिति तदा जपुन सोडी ।
देवांतक खङ्गास्त्रा
पक्षि पडति देववृंद भय जोडी ॥ २ ॥
नानापरि प्रवर्ते
देवासुरयुद्ध पातली रात ।
मायामय अदिति असुर
निर्मुनि बहुधा छळीति समरांत ॥ ३ ॥
गर्जोन नभोवाणी
बोले केवळ असे असुरमाया ।
हो गुप्त अदिति शिववर-
योगें निशि मरण ये न असुरा या ॥ ४ ॥

होतां प्रभात गजमुख
देव दिसे दानवा वधी तूर्ण ।
ज्योति विनायकदेहीं
शिरतां सुर हृष्ट होति संपूर्ण ॥ ५ ॥
हर्षें विनायकाचें
तें ठेविति नाम ऋपि हृषीकेश ।
धरणीधर नाम नृपति
ठेविति सुख हो जनीं न भयलेश ॥ ६ ॥
मग मागधदेशाधिप
ये निजकन्या सदार घेऊन ।
राजसुतविवाह घडे
विनायका नमिति पौर येऊन ॥ ७ ॥
कश्यपगृहा विनायक
जातां आश्वासि पौरजन सर्व ।
मन्मूर्ति ह्मणे स्थापुन
भजतां लोकीं दुर्जें न सुखपर्व ॥ ८ ॥
मातापित्यां विनायक
भेटे नमि सिद्धिबुद्धिसह तूर्ण ।

हरला भूभार वदे
कवि आत्माराम हेतु करि पूर्ण ॥ ९ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
पंचदश रसाळ गोड अध्याय ॥ १९ ॥

---

श्रीरवि गौरवि मिरवी
सिंधुचरित षोडशोत्तराध्याय ।
केकिस्वच्छत्रेरित-
कवि रवि भवसिंधुसुकविता गाय ॥ १६ ॥
धाता सांगे व्यासा
न गणेशकथा पितां उरे क्लेश ।
सिंध्वाख्य दैत्य माजे
शिवगेहिं यदर्थ हो मयूरेश ॥ १ ॥
मैथिलदेशींचा नृप
शांत असे चक्रपाणिनामक हा ।

स्त्री चारुहासिनी हो
सांब सुबोधन अमात्य चतुर पहा ॥ २ ॥
होतां प्रजा न वांचे
ह्मणुनी इच्छी तपोवना जाया ।
तों आश्वासी शौनक
मुनि होइल सुत तुला ह्मणे राया ॥ ३ ॥
व्रत भानुसप्तमीहुन
मासावधि पाळि भूप मुन्युक्त ।
रवि चारुहासिनी पति-
रूपें स्वप्निं निशि भोगि उद्युक्त ॥ ४ ॥
राहे गर्भ न साहे
तेज ह्मणुन चारुहासिनी सोडी ।
सिंधुजळीं द्विजवेषें
उदधि कळवि आणि भूप यश जोडी ॥ ५ ॥
वाढे बाळ तपोवनिं
जातां रवि हो प्रसन्न दे अभय ।
सत्ता त्रिजगिं अनंत-
ब्रह्मांडपतीहुनी परंतु भय ॥ ६ ॥

मग चारुहासिनीसह
तो स्वर्गी चक्रपाणि नृप जाय ।
सिंधु सबळ जिंकी सुर
बैसे इंद्रासनीं असुरराय ॥ ७ ॥

पाहुन तद्रणलाघव
पावे हरि सिंधु याचि वर तूर्ण ।
ममगंडकीपुरिं रहा
सुर जाति तथास्तु ह्मणुन संपूर्ण ॥ ८ ॥

मग धर्मलोप होतां
गुरुवचनें देव पूजिती भावें ।
सुर पाहुन माघासित-
चतुर्थि अंगारकी वरद पावे ॥ ९ ॥

सिंहारूढ गणेश
प्रकटे सायुध वदे अवतरोनी ।
शिवगृहिं रक्षिन तुह्मा
मग होतो गुप्त भाषण करोनी ॥ १० ॥

गणगंगागौरींसह
दंडकवनिं शिव वसे विरक्त सदा ।

पुसतां गौरीस वदे
मी ध्यातों त्रिगुणमयगुणेशपदा ॥ ११ ॥
एकाक्षरमंत्र शिवा
शिवोक्त जपतां प्रसन्न हो विकट ।
हरिहरविधिस्वरूपें
त्रिगुणमयगुणेशमूर्ति हो प्रकट ॥ १२ ॥
अंबा विनवी होई
मम पुत्र तथास्तु तो ह्मणे स्थापी ।
त्रिगुणेशमूर्ति गौरी
यद्भजनें लोक उद्धरे पापी ॥ १३ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
सोळावा हा रसाळ अध्याय ॥ १६ ॥

---

श्रीमद्गुणेशसंभव
वर्णी सप्तदश उत्तराध्याय ।

बर्हिस्त्रातपवारण-
नोदित शिवसुत अतप्त कविगाय ॥ १७ ॥

मृण्मयगुणेशमूर्ति
श्रद्धेनें पूजि पार्वती आर्या ।
भाद्रपदसितचतुर्थी-
दिनिं हो शुभलग्निं साधि सुरकार्या ॥ १ ॥

गिरिजा ह्मणे मम सुत
प्राकृत होऊन हेतु करिं पूर्ण ।
ह्मणुन तथास्तु गणपति
प्राकृतसा होउनी रडे तूर्ण ॥ २ ॥

हर्षें अकरावे दिनिं
ठेवी तन्नाम शंकर गुणेश ।
सिंधूस नभोवाणी
बोले मर्दील संशय न लेश ॥ ३ ॥

सिद्धक्षेत्रीं दंडक-
वनिं मग गृध्रासुरास खळ दवडी ।
गृध्रासुर बाळा ने
नभिं बाळक आंवळोन त्या रगडी ॥ ४ ॥

क्षेम कुशल दोन असुर
मूषक होऊन बाळ पाहाती ।
चूंचूं शब्द करोनी
वधण्या शिशु रगडि त्यां धरुन हातीं ॥५॥
मध्यान्हि एकदा शिशु
निजवुन पर्यंकि पार्वती पहुडे ।
गुप्त उचलतां बाळ
व्यसनीं मार्जाररूप असुर बुडे ॥ ६ ॥
वांटी शिवा हरिद्रा
कुंकुम बालासुरा वरद रगडी ।
सामुद्रिक थोर कथी
मरीचि ऋषि पसरि साधु पदर गडी ॥७॥
पंचममासीं व्योमा-
सुर वधि शिशु बाधतां समारंभा ।
अंबा रडे हंसे मग
संस्कार घडे न सेवितां दंभा ॥ ८ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।

स्वाभिध पुराणसंमत
सतरावा हा रसाळ अध्याय ॥ १७ ॥

श्रीवरदकृतकमठमुख-
वध कथि अष्टादशोत्तराध्याय ।
शितिकंठस्वच्छत्रे-
रित कवि शठशमन सच्चरण गाय ॥ १८ ॥

व्योमासुरभगिनी शचि-
रूपें घेतां गुणेश तीस वधी ।
तंव धीर साधि सिद्ध-
क्षेत्रीं कमठासुर त्वरे अवधि ॥ १ ॥
सिंधुप्रेषित पावे
कमठासुर कपटि रात्रि ते अंबा ।
तत्पृष्ठिं निजवितां शिशु
भारें वधि असुर लवि न विलंबा ॥ २ ॥
सप्तममासीं अंबा
घेउन शिशु पुष्पवाटिके पहुडे ।

मग तल्पकासुर नभीं
माथां घेऊन मंचकास उडे ॥ ३ ॥
वाहे शोक अपर्णा
तल्पक करितो गुणेश शतचूर्ण ।
स्कंधिं उचलितां पुनरपि
रगडि खळा वधि गुणेश त्या तूर्ण ॥ ४ ॥
मग मायावी दुंदुभि-
नामा फळ अर्पि असुर विषभरित ।
तें भक्षि बाळ न मरे
दाढिशिखा धरुन खळ वधी त्वरित ॥ ५ ॥
विजयी होतां अंबा-
सुत करिती पुष्पवृष्टि सुर सर्व ।
माता येउन सत्वर
हृदयीं धरि बाळ मानि सुखपर्व ॥ ६ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
अठरावा हा रसाळ अध्याय ॥ १८ ॥

श्रीवरदकृपा ऐकवि
एकुणिसावा शुभोत्तराध्याय ।
नीलगलनिजच्छत्रे-
रित नाचवि कांड कुतुक कवि गाय ॥ १९ ॥

मग बाळका गिळितसे
सिंधुप्रेषित विशंक अजगर तो ।
बाहेर निघे तदुदर
फोडून गुणेश तो कवि स्मरतो ॥ १ ॥

मग कज्जलवर्ण गिळूं
शरभासुर पाहतां महाक्रूर ।
आपटुन शिलापृष्ठीं
गुणेश वधि बाळ होउनी शूर ॥ २ ॥

एकदिन नृत्य करितां
पाहोन गुणेश नृत्य करि शर्व ।
पर्व सुखाचें मानुन
नाचे ब्रह्मांड कौतुकें सर्व ॥ ३ ॥

नंतर येतां नूपुरिं
लंबोदर नूपुरासुरा बांधी ।

माते जड उचलीतां
वाटे असुरा झुगारुनी साधी ॥ ४ ॥
हुतुतु हमामा चेंडू
चक्रें गजवक्र खेळतां रगडी ।
शृंगिं धरुन वरि बैसुन
अजासुरा आंसडोन वीर गडी ॥ ५ ॥
कूटासुर हो विषमय
पुष्करिणी बाळ खेळतां तोय ।
पिउन गुणेशकृपेनें
वांचति हतवीर्य दैत्य मृत होय ॥ ६ ॥
मग खेळतां सरोवरिं
विनायका मीनरूप खळ बुडवी ।
अंडजरूप वरंद वधि
असुरा जो निजजनापदा तुडवी ॥ ७ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
रसाळ एकोनविंश अध्याय ॥ १९ ॥

श्रीमद्गुणेशमहिमा
निरवि विसावा शुभोत्तराध्याय ।
स्वकलापिच्छत्रेरित
वरद विसावा भवार्त कवि गाय ॥ २० ॥

चवथे वर्षीं पार्थिव-
मूर्त्यर्चन पार्वती करी भावें ।
स्तन मागतां गुणेशा
रागावे त्या धरावया धांवे ॥ १ ॥

बाळास कर्दमासुर
पळतां गिळि होउनी कपटविप्र ।
त्या वधि गुणेश दावी
मुखिं माते विश्वरूप तें क्षिप्र ॥ २ ॥

सिंधुप्रेरित वधिला
खड्गासुर उष्ट्ररूप मग वरदें ।
तन्मित्र पाडि शिरतां
छाये तद्देह चुरि गुणेश पदें ॥ ३ ॥

हो बाळ चंचळासुर
खेळे बाळांत चेंडुचा खेळ ।

तत्स्कंधिं बैसुन वरद
जातां नभिं रगडि साधुनी वेळ ॥ ४ ॥
मग शिरुन पाकशाळे
बाळांसह गौतमाश्रमीं जेवी ।
वरद अहल्या सांगे
गाऱ्हाणें माय बांधुनी ठेवी ॥ ५ ॥
न्हाउन पाक अहल्या
करूनि नैवेद्य वाढि मग विप्र ।
पाहुन गुणेशरूपें
देवगण करीं क्षमा वदे क्षिप्र ॥ ६ ॥
दावी अनंतरूपें
वरद शिवे बाळ हर्षती सर्व ।
गणराजबंधमोचन
करि माता मानि थोर सुखपर्व ॥ ७ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
गोड विसावा रसाळ अध्याय ॥ २० ॥

श्रीवरदायुधगण गणि
एकविसावा शुभोत्तराध्याय ।
बर्हिस्वप्नतपत्रे-
रित शिव उपदेशि वरद कवि गाय ॥ २१ ॥

एकदिन विश्वकर्मा
स्तवुनी नानापरी शिवे तर्पी ।
गणराया पाशांकुश
पद्मपरश्वायुधें नमुनि अर्पी ॥ १ ॥
कोठून आयुधें त्वां
आणिलिं गणपति वदे मला सांग ।
ऐकोन विश्वकर्मा
सांगे वृत्तांत हर्षुनी सांग ॥ २ ॥
ममदुहिता संज्ञा रवि-
तेज सहे न वनिं अश्विनी होते ।
स्थापून सूर्य यंत्रीं
केलें तत्तेज मीं उणें हो तें ॥ ३ ॥
होऊन ऊनतेजा
अश्व रमे ममसुतेशिं रवि तो कीं ।

तिजहून अश्विनीसुत
जाले विख्यात गणपते लोकीं ॥ ४ ॥
रवि कांततां निघालीं
जीं शकलें आयुधें करुन त्याचीं ।
हरिस गदारि महेशा
त्रिशूल तुज चार देतसें साचीं ॥ ५ ॥
सायुधगुणेश चाले
हाले तेव्हां सपर्वतधरा हे ।
घेऊन विश्वकर्मा
आज्ञा पावे स्वधाम लवलाहें ॥ ६ ॥
एकदिन बालमंडल
खेळे घेउन गुणेश बापा हा ।
पाहे वृकासुर धरूं
सृणिघातें वरद हाणि बा पाहा ॥ ७ ॥
आरंभि गुणेशव्रत-
बंध शिव कृतांत काल हे दोघे ।
गजरूपि असुर करितां
विघ्न विनायक वधून यश हो घे ॥ ८ ॥

मग शिव उपदेशी बटु
गाती नाचति समस्त गंधर्व ।
भिक्षावळ नारींसह
घालि शिवा मानि थोर सुखपर्व ॥ ९ ॥
चंद्र त्रिशूल अर्पी
शिव शोचिष्केश नाम दे ठेवी ।
चिंतामणि चिंतामणि
इंद्र अनंताभिधा दिल्या देवीं ॥ १० ॥
सिंहारूढ सहायुध
दशभुज भासे विनायक अदितितें ।
षड्भुज शिवे निजात्मज
बोधिति सुर तत्व सर्वमिदमिति ते ॥ ११ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
एकविसावा रसाळ अध्याय ॥ २१ ॥

श्रीवरदमयूर मिरवि
बावीसावा शुभोत्तराध्याय ।
शितिगलनिजातपत्रे-
रित न मयूरप मयूरज न गाय ॥ २२ ॥

व्यास कमलजास पुसे
गाया वारावया भवक्लेश ।
नाम गुणेशाचें हो
किमर्थ विख्यातसें मयूरेश ॥ १ ॥
पातालभुवनिं एके
दिनिं कद्रू निजसुता वदे वाचे ।
दुखवी मज विनतेरित
जटायु सांत्वन अहींद्र करि साचें ॥ २ ॥
विनतेस वासुकी मग
आणितसे नागपाशिं बांधून ।
विनता स्मरतां सोडवि
गरुड करी युद्ध वेळें साधून ॥ ३ ॥
निज कोंडले सुत उरगिं
पतिदर्शन ह्मणुन घेतसे विनता ।

त्वदुदरिं मयूर होइल
दंडिल अहि पति वदोन दे सुरता ॥ ४ ॥
इकडे सप्तमवर्षीं
व्रतबंधन अष्टमाब्दिं अध्ययन ।
हो पूर्ण गुणेश उठवि
मृतनर गानें भुले विषमनयन ॥ ५ ॥
पंचाक्ष त्रिमुख चतुः-
शृंगाष्टपद द्विपुच्छ असुर पहा ।
श्वापदरूपें विचरे
वनिं पळतां वधि गुणेश भक्तप हा ॥ ६ ॥
विनतारक्षित आंडें
फोडि वरद त्यांतुनी मयूर निघे ।
धरि तच्छिखे वरि बसे
गुणेश विनता जयास शरण रिघे ॥ ७ ॥
मन्नाम असो तुज हा
वर मागे शिखि तथास्तु वरद वदे ।
ह्मणवि मयूरेश सवें
जाय गृहिं निवे शिवे महोत्सव दे ॥ ८ ॥

एवं गुणेशमूर्ति
व्यासा हीं विधि वदे मयूरेश ।
ती कथिलि कथा भावें
कवि आत्माराम गाय गुणलेश ॥ ९ ॥
पाहुन सरोवर बसुन
शिखिवरि खेळे गुणेश वरि हर्ष ।
जळिं शिरुन असुर वधि ये
बाहेरी बैसतां नवम वर्ष ॥ १० ॥
त्या ह्मणति नागकन्या
आह्मा वरिं वासुकीजवळ नेती ।
अहिमस्तकवर्ती मणि
घे बांधि वरद फणी कटीभोंतीं ॥ ११ ॥
समयूरमयूरेश
त्रिभुवनदाहक वमी विष विशेष ।
जो तत्फणावरि भरें
नाचुन बांधि कटिला नमवि शेष ॥ १२ ॥
इकडे भगासुरमुखीं
शिरतां शिशु करिति शोक तन्माता ।

धरुनि बहुबाळरूपें
मोहि गुणेश जननी गृहा जातां ॥ १३ ॥
मग संपातिजटायु-
श्येन करुन मुक्त भेटवि अशेष ।
शेष गुणेशा बैसवि
सिंहासनिं दावि आदर विशेष ॥ १४ ॥
पूर्वस्थळिं येतां वधि
भगासुरा सावधान करि बाळ ।
काढोन योगमाया
ये निजगेहास बाळक दयाळ ॥ १५ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
बावीसावा रसाळ अध्याय ॥ २२ ॥

---

श्रीहरिरूप वरद कथि ।
तेवीसावा शुभोत्तराध्याय ।

बर्हिस्वच्छत्रेरित
अद्वैत द्वैतहीन कवि गाय ॥ २३ ॥

कश्यपमुखमुन्यर्थित
सगण निघे दक्षिणे शिव गुणेश ।
हाणि शिवदत्तशूलें
कमलासुर शूर घे न भयलेश ॥ १ ॥
रचि नगर विश्वकर्मा
ठेवि मयूरेशपुर असें नाम ।
सप्रमथर्षीश्वर शिव
तेथ वसे मानि योगिविश्राम ॥ २ ॥
स्तवितां वरद विधि वदे
मायामोहें शिवे मला गर्व ।
मावळतां सृष्टि रचि
ब्रह्मांड गुणेश पूर्ववत् सर्व ॥ ३ ॥
जातां शरण श्वासें
ने उदरीं विश्वरूप मज दावी ।
बाहेर काढि गौरवि
गणेश लीला मुखें किति वदावी ॥ ४ ॥

मांडी गौरी गणपति
जन्मदिनद्वादशाब्दिकोत्साहा ।
भाद्रपदसितचतुर्थी-
दिनिं मृण्मयमूर्ति पूजि वा पाहा ॥ ५ ॥
तैं विश्वेदेव असुर
ये भगवद्भक्त विप्र शिवगेहा ।
बसवि शिवा जेवाया
परि जल हरिदर्शनाविण न घे हा ॥ ६ ॥
गणपति ह्मणे पहातां
उमा घडे विष्णुदर्शन तुला हो ।
योग्य न अन्न त्यजणें
ह्मणुन वरद विष्णुरूप नटला हो ॥ ७ ॥
पूजुन मृण्मय गणपति-
मूर्ति स्तवितां पराशरें खाय ।
मृण्मयमोदक ते क्षणिं
विष्णु दिसे क्षणिं गुणेश गणराय ॥ ८ ॥
प्रकटून मयूरेश
प्रतिगृहिं फिरवुन अभेदपण दावी ।

पंचायतनैक्य द्विज
पावे गृहिं वरदभक्तितरु लावी ॥ ९ ॥

श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
तेवीसावा रसाळ अध्याय ॥ २३ ॥

---

श्रीवरदैश्वर्य कळवि
चोवीसावा शुभोत्तराध्याय ।
स्वशिखिच्छत्रेरित कवि
जितदिगिन खलौघहा वरद गाय ॥ २४ ॥

मग गणपति त्रयोदश-
वर्षिं ध्यानस्थशिवशिरस्थ पहा ।
शशि घेउन खेळे वनिं
वधि सूकररूपमंगलासुर हा ॥ १ ॥

ध्यान विसर्जुन शिव शशि
न पाहतां जा वदे गणां चोर ।

आणा गण धांवति गण-
पति नाणुं शकति अनर्थ हो थोर ॥ २ ॥
निघतां सर्वें शिव दिसे
शशि भाळिं गणेश अंकिं शिव तो घे ।
बैसवि वामांकिं शिवा
कलह मिटे दिसति देवसम दोघे ॥ ३ ॥
एवं त्रयोदश सरे
बैसे वरदास वर्ष चवदावें ।
गौतममुखमुनिंस शिवा
कथि ते मानोन हर्ष च वदावें ॥ ४ ॥
त्यजुनी जरी त्रिसंध्या-
क्षेत्र वसों येथ बाधति अपाय ।
पाय नमुनि पुसतां मुनि
वदति शिवे इंद्रयाग सदुपाय ॥ ५ ॥
यज्ञारंभिं वरद वधि
कलविकल क्रूरदैत्यवर दोघे ।
त्यजि इंद्रमूर्ति विझवी
अग्नि रुसे इंद्र नियतिच्या ओघें ॥ ६ ॥

आटोपी वन्हिपवन
तापवि रवि पीडि पौरजन शक्र ।
वक्र न वरदाचें हो
मायेचें वश जया असे चक्र ॥ ७ ॥
हो इंद्रगर्वमोचन
बैसे वरदास पंचदश वर्ष ।
व्याघ्रासुरा मुलांसह
गुणेश वधि खेळतां वनिं सहर्ष ॥ ८ ॥
व्याघ्रभयें पळतां वनिं
मुलें न गवसति गुणेश बहु धुंडी ।
निजतां तिं दक्षिणदिशे
पाय करुन पडति सर्व यमतुंडीं ॥ ९ ॥
बाळें यमलोकांहुन
आणि मयूरेश दवडि यमगर्व ।
सर्वजगत्पाल नमी
कवि आत्माराम मानि सुखपर्व ॥ १० ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।

स्वाभिध पुराणसंमत
चोवीसावा रसाळ अध्याय ॥ २४ ॥

---

श्रीवरदविजय गाजवि
पंचविसावा शुभोत्तराध्याय ।
आत्मारामसयूर-
च्छत्रेरित विप्रपंचकवि गाय ॥ २५ ॥

गिरिजा वदे स्नुषामुख
पाहुन होइन कदा शिवा धन्या ।
नारद बोले उपवर
असती लावण्यराशि विधिकन्या ॥ १ ॥

सोयरिक उभयपक्षा
योग्य गमे शिव निघे वरासहित ।
ये जवळ गंडकीपुर
वाळ वधिति दैत्य मार्गिं भयरहित ॥ २ ॥

शंभूस गुणेश वदे
कारागृहिं सिंधु देव जे घाली ।

सोडवुन समारंभीं
ते न्यावे गोष्ट शिवमना आली ॥ ३ ॥
नंदी शिष्टाईस्तव
जाय वदे सिंधुलागिं सुर सर्व ।
कार्यार्थ सोड अथवा
रणार्थ हो सिद्ध धरुं नको गर्व ॥ ४ ॥
हितवचन नायके खळ
वार्ता नंदी शिवात्मजा सांगे ।
गर्जुन गुणेश पाठवि
पुष्पदशन भूतराज रण जागे ॥ ५ ॥
मग सिंधु मित्र कौस्तुभ
झगडाया पाठवी सचिव दोघे ।
त्यां वीरभद्रनंदी-
सहित षडानन वधून यश तो घे ॥ ६ ॥
शार्दूल धमन गंधा-
सुर वीरध्वज पहा महाकाय ।
रणिं कांत वीर धूर्ता-
सुर मोकलि सात हे असुरराय ॥ ७ ॥

षण्मुख नंदी भूतप
पुष्पदशन वीरभद्र भट विकट ।
चपळ असे झगडति शिव-
गण सात सरे दिनत्रय प्रकट ॥ ८ ॥

षण्मुख गंधासुर वधि
तैं क्रोधन वीरसेन शतहंता ।
हे धरिति षडास्य वधुन
करि मुक्त हिरण्यगर्भ गुणवंता ॥ ९ ।

वधि वीरभद्र हि मदन
कांता एका महासुरा नंदी ।
वंदी जो शिव दे यश
गातां ये का महा सुरानंदीं ॥ १० ॥

धूर्तध्वजासुर महा-
काय चपल भूतराज सुमदंत ।
विकट वधिति चार तिघे
सुरजयजयकार हो रुपर्यंत ॥ ११ ॥

श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।

स्वाभिध पुराणसंमत
पंचविसावा रसाळ अध्याय ॥ २१ ॥

श्रीवरदगणपराक्रम
षड्विंश मिरवि शुभोत्तराध्याय ।
आत्ममयूरच्छत्रे-
रित नंदीषणमुखादि कवि गाय ॥ २६ ॥

सिंधु क्रोधावेशें
मूर्छित शिवगण करीतसे सर्व ।
पर्वतसा पाहुन गण-
पति बोले व्यर्थ वाहणें गर्व ॥ १ ॥

कर्णमुकुट सिंधूचे
छेदि मयूरेश रविवर स्मरतां ।
सर्वत्र वरद पाहे
सिंधु सुगति इच्छि तत्करीं मरतां ॥ २ ॥

चिंतातुर दैत्य शयन
करि तल्पकिं जाउनी गृहा तूर्ण ।

विजयी गुणेश पाहुन
हर्षति देवगण विप्र संपूर्ण ॥ ३ ॥
वृषवीरभद्रषण्मुख
पुष्पदशनभूतराजमुख वीर ।
पाहुन मूर्छित रणिं गण-
पति औषधि देउनी उठवि धीर ॥ ४ ॥
इकडे दुर्गा सिंधु-
स्त्री पाहुन खिन्न तल्पकीं स्वपती ।
खळ बोधितां तिस वदे
मज वधिल गुणेश संत जो जपती ॥ ५ ॥
मग सिंधु सभे येतां
शालक गौरवुन धाडि कलविकल ।
नंदीषण्मुखमुख भट
त्यां वधति सुरर्षि हर्षती सकल ॥ ६ ॥
शिवगण विजयी होउन
गौरीशंकर नमीति संपूर्ण ।
भेट मयूरेश्वर दे
आत्मारामाभिराम हो तूर्ण ॥ ७ ॥

श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
षड्विंश रसाळ गोड अध्याय ॥ २६ ॥

---

श्रीवरद सिंधु वधि हें
सुसप्तविंश कथि उत्तराध्याय ।
केकिस्वच्छत्रेरित
सुतप्त भवसिंधुपोत कवि गाय ॥ २७ ॥

कलविकलमरणवार्ता
परिसून अधर्म धर्म सिंधु सुत ।
दोघे मोकलि रणिं वधि
षण्मुख गांठोन वीरभद्रयुत ॥ १ ॥
सिंधुसती दुर्गा हो
मूर्छित उपदेशितां उठे उमजे ।
करि चक्रपाणि बहुपरि
बोध न समजे रणार्थ सिंधु सजे ॥ २ ॥

नाटोपतां शिवगण
द्रुत जपुनी मंत्र सिंधु निर्मितसे ।
कालपुरुष शिवगण भी
गुणेश वधि परशुनें खळ अमितसे ॥ ३ ॥
परशूद्भव पुरुष गिळुन
दानवपुरुषा गिळी असुरसेना ।
हो गुप्त गुणेश भिडे
सिंधु पळे गृहिं उपाय गवसेना ॥ ४ ॥
पावे गुणेश विजयी
शिवांतिकीं नारदोक्त सगण निघे ।
शिखिवरि बैसुन रगडुन
वधि सिंधुस परशुनें यश सुमति घे ॥ ५ ॥
असुरसती दुर्गा त-
त्तात रडे चक्रपाणि संस्कार ।
पुत्राचा करि दुर्गा
आदरि सहगमन हो चमत्कार ॥ ६ ॥
मग चक्रपाणिवचनें
वरद शिरे गंडकीपुरींत जन ।

पाहुन गुणेशमूर्ति
स्तवि सेवी चक्रपाणि सद्गजन ॥ ७ ॥
गंगोदकें गुणेशा
करि पूजुन चक्रपाणि अभिषेक ।
ह्मणति जय मयूरेश्वर
जय हर्षे सान थोर नावेक ॥ ८ ॥
मग मोहें इंद्र ह्मणे
वृद्धसुर त्यजुन बाळका भजसी ।
त्या चक्रपाणि बोले
बाळ दिसे ब्रह्मरूप हा मजसीं ॥ ९ ॥
हें नृप वदतां प्रकटे
स्वरूप दशबाहु सिद्धिबुद्धियुत ।
गर्जोन नभोवाणी
बोले हा परमपुरुष शंभुसुत ॥ १० ॥
परिसुन इंद्र गुणेशा
आराधी गडबडोन वमि गर्व ।
शर्वसुता आनंदें
स्तवि आत्माराम मानि सुखपर्व ॥ ११ ॥

श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
रसाळ हा सप्तविंश अध्याय ॥ २७ ॥

---

श्रीवरदविवाहादिक
कथि अष्टाविंश उत्तराध्याय ।
बर्हिस्वातपवारण-
नोदित अवतारकृत्य कवि गाय ॥ २८ ॥

**नारद वदे चलावें**
**लग्ना शिव दे रुकार साधा या ।**
**अरिपाणि सहाय यथा-**
**विधि जाया सिद्धिबुद्धि साधाया ॥ १ ॥**
**गणनाथविवाहोत्सव-**
**दिव्यसमारंभ पाहतां सर्व ।**
**शिवगिरिजा संतोषति**
**कवि आत्माराम गाय सुखपर्व ॥ २ ॥**

निजगृहिं वसोन आचरि
गिरिजासुत सिद्धिबुद्धियुत केली ।
दोघि सुना सेवीती
अंबांघ्रि यदर्थ सन्मति भुकेली ॥ ३ ॥

मग एकदा वदे गण-
पति मम अवतारकृत्य हो माते ।
केलें धर्मावन खल-
शासन जाया निरोप दे मातें ॥ ४ ॥

गिरिजासांत्वन नाना-
परि करुन वदे गुणेश तव उदरीं ।
होइन गजवदन असें
ह्मणुनी हो गुप्त घे शिवा पदरीं ॥ ५ ॥

धाता व्यासा सांगे
सर्वोत्तम हा गुणेशमहिमा जी ।
हो परिसतां जन सदा
आत्मारामाभिराम महिमाजी ॥ ६ ॥

श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।

स्वाभिध पुराणसंमत
हा अष्टाविंश गोड अध्याय ॥ २८ ॥

---

श्रीगजमुखजनि गौरवि
एकोनत्रिंश उत्तराध्याय ।
शितिकंठस्वच्छत्रे-
रित कवि ऐकोन तुष्ट हो गाय ॥ २९ ॥
व्यास मयूरेशकथा
परिसून पुसे गजाननचरित्र ।
बर्हिस्वच्छत्रेरित-
चित्रचमरमित्र गौरवि पवित्र ॥ १ ॥
होय गुणेश त्रेता-
युगिं हो द्वापरिं गजानन किमर्थ ।
मूषकवाहन कां हो
विस्तारुन सांगणें सकल अर्थ ॥ २ ॥
धाता वदे उठवितां
काम मला सत्यलोकिं मी जागा ।

होउन जृंभा देतां
तिजहुन सुत दिव्य हो महाभागा ॥ ३ ॥
मी वदलों कीं क्रोधें
ज्या तूं आलिंगिशील शतचूर्ण ।
तो होइल हें ह्मणतां
स्थान सुर त्यजुन पळति संपूर्ण ॥ ४ ॥

प्रत्यय पहावया तो
धांवे आलिंगण्यास मजमागें ।
तव नाम सिंधुरासुरं
तुज वधिल गजास्य हें वदें रागें ॥ ५ ॥
गजवदन सुगंधासुर-
शोणितमर्दन करील निजदेहा ।
हें वदुनी वैकुंठीं
मी जातां सिंधुरा हरि वदे हा ॥ ६ ॥
आहें सात्विक मी तो
ब्राह्मण चतुरास्य युद्धगति नेणे ।
झगडेल हर तुजसिं परि-
सुन जाउन हरिलि पार्वती तेणें ॥ ७ ॥

पार्वत्यर्थ शिव निघे
तैं ब्राह्मणवेष घे गजास्य वदे ।
पति जिंक तिचा परिसुन
ठेवि तदंतिकिं शिवा वदे रण दे ॥ ८ ॥
दोघे झगडति येउन
गुप्त दुखवि परशुनें गणेश पळे ।
भूलोकिं असुर अंबे
वधिन वदे सिंधुरा गजास्य पळें ॥ ९ ॥
हें वदुन गुप्त होतो
त्वदुदरिं जन्मेल शिव वदे अंबे ।
सिंधुरभय पावे गुरु
वदे भजावा गजास्य अविलंबें ॥ १० ॥
पावोन गणेश वदे
शिवगृहिं जन्मेन गुप्त हो शिव ते ।
दोहदवती शिवा वनिं
ठेवि वरद अवतरे शिवा निवते ॥ ११ ॥
दिव्यस्वरूप पाहुन
पुसतां गिरिजे वदे मयूरेश ।

त्रेतायुगिं जो तोची
प्रकटें मी त्वदुदरीं न भयलेश ॥ १२ ॥
हें वदुन चतुर्भुज हो
तो गजमुख सिद्धिबुद्धिसह साजे ।
लाजे शिवा रडे शिव
शुंडादंडें वदे सुत विराजे ॥ १३ ॥
बाळक वदे वरेण्या-
भिधनृप माहिष्मती पुरी आहे ।
प्रसवे पुत्र ममवरें
तत्कांता पुष्पिकाभिधा गा हे ॥ १४ ॥
ती निजलि असे तों मज
ठेवा तिकडे भजेन दोघां मी ।
नंदी शिवोक्त मार्गें
ये सुत ठेवोन पुष्पिकाधामीं ॥ १५ ॥
धेनुसुत वदे मार्गी
आडवितां राक्षसी वधुन दुष्ट ।
वधिले गंधर्व परत
आलों हो परिसतां चि शिव तुष्ट ॥ १६ ॥

श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
एकोनात्रिंश गोड अध्याय ॥ २९ ॥

---

श्रीवरद्वास मुनिगृहिं
वर्णि तिसावा शुभोत्तराध्याय ।
नीलगलनिजच्छत्रे-
रित मूषकपत्र सत्र कवि गाय ॥ ३० ॥

इकडे गर्जोन नभो-
वाणी असुरा वदे न भागावें ।
तुज वधिल पार्वतीसुत
परिसुन कैलासिं दैत्यवर धांवे ॥ १ ॥
कैलासिं दिसे न शिवा
धुंडीतां आढळे वनांतरिं ते ।
धांव ह्मणतां गजानन-
मूर्ति दिसे बाळ हो रुदन करितें ॥ २ ॥

पाहे खळ आपटण्या
सर्वेश्वरं वाढतां उद्कें सोडी ।
क्षोभति सप्तोदधि तैं
हो तीर्थ स्नान जैं सुकृत जोडी ॥ ३ ॥
बालांगशोणित पडे
ते जाले नार्मदेयपाषाण ।
वरि नार्मदेयगणपति
पूजुन जन भुक्तिमुक्ति मनिं आण ॥ ४ ॥
पडतां बालक हो तें
गुप्त पुरुष कृष्णवर्ण बहु डोले ।
जन्मुनि गणेशकुंडा-
हुन वाढे त्वदरि भूतलीं बोले ॥ ५ ॥
शंकर हिमनगबाळा
नेउन कैलासिं ठेवि विघ्नार्ता ।
इकडे आश्चर्य घडे
परिसा हो पुष्पिकासदनवार्ता ॥ ६ ॥
मग पुष्पिका प्रसवतां
ते शुंडायुक्तमूर्ति हो पाहे ।

राजोक्त सेवक वनीं
टाकिति नेऊन बाळ लवलाहें ॥ ७ ॥
तप करि तेथ पराशर
मुनि पत्नी वत्सला सती त्याची ।
प्रतिपाळि बाळ पाहुन
धन्य ह्मणुन आपणास घे साची ॥ ८ ॥
धाता बोले व्यासा
मूषकवृत्तांत हा परिस आतां ।
ताडि पदिं वामदेवा
गंधर्व क्रौंच हरिसभे जातां ॥ ९ ॥
क्रोधें मुनि बोले हो
मूषक घे पृष्ठिं गजमुखा तूर्ण ।
तेणें उद्धरशिल खळ
हो मूषक वरद हेतु करि पूर्ण ॥ १० ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
गोड तिसावा रसाळ अध्याय ॥ ३० ॥

श्रीवरदपत्र गौरवि
एकतिसावा शुभोत्तराध्याय ।
स्वकलापिच्छत्रेरित
विपत्र कवि आखुपत्रगुण गाय ॥ ३१ ॥

मग वामदेवशापें
भूषक हो क्रौंचसंज्ञ गंधर्व ।
जाउन पराशराश्रमिं
वसनें फाडि करि धान्य गट सर्व ॥ १ ॥

मुनि धावरतां गणपति
आणि धरुन मूषका वदे वर हा ।
माग तया तूंचि वदे
माग ह्मणे मज गणेश पृष्ठिं वहा ॥ २ ॥

व्यास पुसे पूर्वि विधे
मूषक रचि पुण्यपाप हा काय ।
विधि बोले परिसावें
आत्माराम स्तवी महाकाय ॥ ३ ॥

सौभरिमुनि मेरुशिखरिं
राहे त्याची मनोमयी भार्या ।

गंधर्व क्रौंच छळी
मूषक हो हें वदे मुनि अनार्या ॥ ४ ॥
मुनि सदय वदे वाहुन
पृष्ठिं गणेशास होशिल पवित्र ।
गणपतिपत्र ह्मणुनि हो
गंधर्व गणेशकौतुक विचित्र ॥ ५ ॥
होतां नववर्षांचा
गजानन वदे पराशरा नमुनी ।
सिंधुरवधार्थ आज्ञा
द्यावि मला मग वदे तथास्तु मुनी ॥ ६ ॥
धरुन विराड्रूप वरद
वधि सिंधुर रक्त आनना लावी ।
सिंधुरवदन ह्मणुन हो
सिंदूरप्रिय कृतार्थपण दावी ॥ ७ ॥
स्थापिति सुर गणपति तैं
प्रार्थून वदे वरेण्य तार मला ।
उपदेशि वरेण्या तो
गणेशगीतार्थ परिसतां रमला ॥ ८ ॥

श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
एकतिसावा रसाळ अध्याय ॥ ३१ ॥

---

श्रीवरदविभूति वदे
बत्तीसावा शुभोत्तराध्याय ।
बर्हिस्वप्रतपत्रे-
रित पंचायतनगुह्य कवि गाय ॥ ३२ ॥

व्यास वदे विधिस ह्मणसि
कोठ वरि गजासुरास्य गजवदन ।
येथ ह्मणसि सुत गजमुख
जन्मे गिरिजोदरीं यशःसदन ॥ १ ॥
व्यासा वदे विधि परिस
शिववक्राहून हो ह्मणति कोठें ।
तत्क्रोधाहुन गौरी-
मलाहुन गणेश हो नवल मोठें ॥ २ ॥

कोठें द्विमुख षडानन
दशभुज पंचास्य षड्भुज तसा च ।
विधि हरि हर देव जगत्
पंचायतनस्थ एक रचि साच ॥ ३ ॥

आदिपुरुष एक नटे
नटसा जो पांच वेष बापा हा ।
टाळाया नरक वहा
पंचायतनीं न भेद् बा पाहा ॥ ४ ॥

कृतिं कश्यपज विनायक
हो त्रेताद्वापरीं भवान्युदरीं ।
तो धूम्रवर्ण कलियुगिं
भूभर गजकर्ण हरिल वधुन अरी ॥ ५ ॥

व्यास पुसे होइल जगिं
किमर्थ हा धूम्रवर्ण गणराय ।
विधि बोले कलियुगिं खळ
होतील बलिष्ठ साधु निरुपाय ॥ ६ ॥

मग धूम्रवर्ण होउन
नीलहयारूढ खड्गधर तूर्ण ।

सद्‌वन असत्क्षय करुन
होइल तो गुप्त हेतु परिपूर्ण ॥ ७ ॥

व्यास वदे भ्रांति सरे
शांति भरे पद्मजोक्त करि तप हा ।
वरदवरें अष्टादश-
पुराणवक्ता विशंक होय पहा ॥ ८ ॥

सिद्धक्षेत्रीं स्थापी
व्यासमुनि गणेशमूर्ति बा पाहा ।
तद्दर्शनें भव सरे
गुण आत्माराम गाय बापा हा ॥ ९ ॥

श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध्र पुराणसंमत
बत्तीसावा रसाळ अध्याय ॥ ३२ ॥

---

श्रीवरदकृपा गौरवि
तेतीसावा शुभोत्तराध्याय ।

शितिगलनिजातपत्रे-
रित कवि शुचि सोमकांतनृप गाय ॥ ३३ ॥

ऐशी कथा परिसतां
आनंदें सोमकांत नृप डोले ।
तें पुण्य आम्रभस्मीं
सोड तरु फुटेल भृगु असें बोले ॥ १ ॥

नृप मुन्युक्त पुराण-
श्रवणसुकृत आम्रभस्मि तो टाकी ।
तरु वाढे नृप शुचि हो
गजाननकृपाबळें न तोटा कीं ॥ २ ॥

पावे विमान गपणति-
वरें वसे त्यांत भूपति सदार ।
सात्मज निघे पुराण-
श्रवणफळबळें प्रजांसह उदार ॥ ३ ॥

ह्मणति जय मयूरेश्वर
जय जय सर्वेश्वरेति जन सर्व ।

जाति विनायकलोकीं
पाहाति गजास्य हो महापर्व ॥ ४ ॥
सप्रज गणेशलोका
सूत वदे शौनका नृपति जाय ।
करुनि गणेशपुराण-
श्रवण फल वदेल तें फणी काय ॥ ५ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
तेतीसावा रसाळ अध्याय ॥ ३३ ॥

---

श्रीवरदकथा गौरवि
चवतीसावा शुभोत्तराध्याय ।
स्वमयूरात्मच्छत्रे-
रित रुचिर प्राकृतार्थ कवि गाय ॥ ३४ ॥
ग्रंथ प्राकृत करवुन
भाविकहस्तीं गजानन समर्पी ।

ह्मणवोन कृपाळु खरा
आत्माराम प्रसन्न संतर्पी ॥ १ ॥
जे इक्षुदंडरुचि ते
घेतां श्रमती अशक्तजन सर्व ।
रुचि शर्करेचि घेती
प्राकृतसंस्कृत भजा त्यजा गर्व ॥ २ ॥
पाठवि पुराणरूपें
गणेश भागीरथी जन स्नान ।
तेथ करितां तरति हें
व्यासोक्त पहा वहा न हा मान ॥ ३ ॥
एकविसवार करितां
आवर्तन हो प्रसन्न गणराय ।
क्रीडाखंडाचा करि
आवर्तन पूर्ण आदिमाध्याय ॥ ४ ॥
बाविस उपासनाभिध-
खंडीं अध्याय असति चवतीस ।

क्रीडाखंडीं कवि षट्-
पंचाशत् वाहि जे गणपतीस ॥ ९ ॥
श्रीमद्गणेशलीला-
मृतगक्रीडाख्यखंड कवि गाय ।
स्वाभिध पुराणसंमत
चवतीसावा रसाळ अध्याय ॥ ३४ ॥

---

इतिश्रीमन्मयूरात्मच्छत्रेरित-
गणेशलीलामृतक्रीडाखंड ।

॥ श्रीगणेशार्पणमस्तु ॥

समाप्त.

# अथ श्रीमद्वरदद्वादशनामार्याष्टक.

श्रीवरद वरा वाणी
वाना गा गिरिश पद्मनाभ भजा ।
दिनमणि नमा वरदवर-
नामार्याष्टक सदा स्वकृत समजा ॥ १ ॥

न कदापि हो मुखश्री
म्लान सुखश्री स्फुरे सुमुख गातां ।
जो एकदंत संतत
संत तया तरति चिंतुनि अनंता ॥ २ ॥

कपिल सकळदेवांत
प्रिय कपिलाषष्ठि जेविं पर्वांत ।
गजकर्णवर्णन करी
तो धन्य विशंक होय सर्वांत ॥ ३ ॥

लंबोदर न विसंवो
निजभक्तातें कदापि संसारीं ।

राहो विकट निकट तो
फुकट न हो जन्म पुण्य हो भारी ॥ ४ ॥
जो विघ्ननाश त्याची
करणी लोकत्रयीं सदा गाजे।
जगदाधि सारि तारी
भक्ता ऐसा गणाधिप विराजे ॥ ५ ॥
जो धूम्रकेतु हेतु
प्रियभक्ताचा समस्त तो पुरवी।
सफल गणाध्यक्ष करी
जन्म दुरितदैन्यताप जो नुरवी ॥ ६ ॥
कालत्रयीं अतंद्रित
निजभक्ता भालचंद्र संभाळी।
काम भजा न नमुनि तारि
भावें तुह्मा गजानन न गाळी ॥ ७ ॥
एवं श्रीवरदकृपा
होतां भक्ता उणें असे काय।
श्रीमद्वरदद्वादश-
नामार्याष्टक मयूरसुत गाय ॥ ८ ॥

